बुधवार, १० जुलै २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ३०४
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 10 JULY 2024 | adhunikkesari.com | YEAR-03 • ISSUE-304 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05



आधुनिक केसरी

जगन्नाथ पुरी येथील रथयात्रेच्या पार्श्वभूमीवर चंद्रपूरमध्येसुद्धा निघाली भव्य शोभायात्रा छायाचित्र : शाम हेडाऊ

# कुणाला पाडायचे हे न सांगितल्याने मराठ्यांचे तिसऱ्यालाच मतदान

## मनोज जरांगे : बीडमध्ये रॅली काढणारच

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर : मराठ्यांना जातीवादी म्हटल्यावर कसा कार्यक्रम लावला. मी तर केवळ पाडाच म्हटलो होतो, कुणाचे नावही घेतले नव्हते. पण एक चूक आपल्याकडून झाली. कुणाला पाडायचे हे सांगितले नसल्यामुळे 10 हजार मराठ्यांनी तिसऱ्यालाच मतदान केले. तर 20 हजार मराठ्यांनी मतदानच केले नाही. त्यामुळे 30 हजार मतदान आमचे वाया गेले, असे लोकसभा निवडणुकीतील पाडापाडीचे, मतांचे गणित मांडत मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांनी लातूरमध्ये मांडले.**

मनोज जरांगे पाटील यांची शांतता रॅलीला हिंगोलीतून सुरुवात झाली. हिंगोली, परभणी, नांदेडनंतर मंगळवारी लातूरमध्येही मनोज जरांगे यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. लातूरमधील भाषणातून पुन्हा एकदा मनोज जरागें यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्यावर निशाणा साधला. बीडमधील शांतता रॅलीला पोलीस प्रशासनाने परवानगी नाकारली असली, तरीही बीडमध्ये शांतता रॅली काढणारच असल्याचा निर्धार जरांगे यांनी बोलून दाखवला. यावेळी नाव न घेता पालकमंत्री धनंजय मुंडेंनाही लक्ष्य केले. जरांगे यांनी लातूरमधील भाषणातून लोकसभा निवडणुकीतील पाडापाडीचे, मतांचे गणितही सांगितले आहे. बीड जिल्ह्यातील मराठे 11 तारखेला घराला दारं-कुलपं लावून रॅलीला येणार आहेत. म्हाताऱ्या माणासांपासून लेकरं, नोकरदारसुद्धा घरी राहणार नाहीत. फडणवीस साहेब आणि अजित पवार यांच्या



सांगण्यावरुन बीडच्या पालकमंत्र्यांनी तिथल्या एसपीला सांगून तिथली रॅलीची परवानगी रद्द केली. तरीही सांगतो, बीडची रॅली बीडमध्ये शांततेत होणार... असे म्हणत बीडमध्ये 11 जुलै रोजी शांतता रॅली होणारच, असे जरांगे यांनी ठणकावून सांगितले. यावेळी अप्रत्यक्षपणे त्यांनी धनंजय मुडेंवर निशाणाही साधला.

बीडच्या पालकमंत्र्यांना असला जातीवाद शोभत नाही, आम्ही नाही कधी जातीवाद केला. 5-5 पिढ्या तिथल्या मराठ्यांनी तुम्हाला मोठे करायचे काम केले, आम्ही जातीवादी नसून आमच्या लेकरांसाठी आम्ही एकत्र आलो आहोत. फडणवीस साहेबांना माझा 6 वा सवाल आहे, आत्तापर्यंत ओबीसींच्या नेत्यांना निवडून दिले, ओबीसींना एकगठ्ठा मतदान केले, आम्ही कधीही ओबीसींना जातीवादी म्हटले नाही. तुमची जात एकत्र आहे राव, आमची जात कवा एक होईल. पण, आमची जात एकदा एकत्र आली तर तुमचं भयानक पोट दुखायला लागली. आम्ही एकगठ्ठा मतदान केले तर आम्ही जातावादी, पण तुम्ही एकगठ्ठा मतदान केले तर जातीवाद नाही?, व्वा रे नाय.. असे म्हणत मनोज जरांगे यांनी नाव न घेता ओबीसी नेत्यांवर हल्लाबोल केला.


# प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे यांना दैनिक आधुनिक केसरीचा 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**संजय व्यापारी**

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती शाहू पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य डॉ. गणेश बळीराम पा. डोंगरे यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल दैनिक आधुनिक केसरीचा 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार जाहीर झाला आहे. शेतकरी कुटुंबातून, विशेषतः ग्रामीण भागातून येऊन स्वकर्तृत्वावर अभियांत्रिकीचे उच्च शिक्षण घेऊन शिक्षण क्षेत्रात अल्पावधीत स्वतःचा वेगळा ठसा उमटवणारे डॉ. गणेश डोंगरे यांचा प्रवास सर्वांसमोर आलाच पाहिजे.







प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे यांचा जन्म देवळा खडकी येथे एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांची आई शांताबाई व वडील बळीराम पाटील डोंगरे यांनी त्यांना लहानपणापासून चांगले शिक्षण व चांगले संस्कार दिले. त्यांचे शालेय शिक्षण देवळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व दयानंद विद्यालय देवळा येथे झाले. दहावीनंतर अकरावी, बारावीसाठी बीड येथे बलभीम महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्यानंतर अभियांत्रिकीच्या शिक्षणासाठी त्यांनी तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय येथे इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन शाखेला प्रवेश घेऊन अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले. दरम्यान त्यांनी काही काळ खासगी उद्योगांमध्ये नोकरी केली. तसेच बीएसएनएलचे अमरावती येथील अनेक एक्सचेंज बसवण्याचे दूरसंचार अभियांत्रिकीमध्ये काम केले. त्यानंतर आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालय येथे लेक्चरर, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर, विभाग प्रमुख, उपप्राचार्य व त्यानंतर प्राचार्य अशा वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. दरम्यान त्यांनी मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन म्हणजेच एमबीए चे शिक्षण पूर्ण केले. अभियांत्रिकीमधील पदव्युत्तर शिक्षण म्हणजेच मास्टर ऑफ इंजिनिअरिंग इन इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग हे शिक्षण शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे पूर्ण केले. 2009 मध्ये छत्रपती संभाजीनगर येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ पॉलीटेक्निक मध्ये त्यांची प्राचार्यपदी निवड झाली. माननीय पद्माकरराव मुळे यांनी त्यांना वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून दिल्या. महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन मुंबई या स्वायत्त संस्थेच्या अभ्यासक्रमाच्या वेगवेगळ्या बैठकांना त्यांना उपस्थित राहण्याची संधी मिळाली. तसेच असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ अनएडेड पॉलिटेक्निकस या राज्यस्तरीय संघटनेच्या महाराष्ट्राच्या सहसचिवपदी काम करण्याची संधी मिळाली.


अभियांत्रिकीमधील सर्वोच्च पदवी म्हणजे डॉक्टरेट. इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंगमध्ये सदर पीएच.डी. चे शिक्षण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथून त्यांनी पूर्ण केले. पत्नी अर्चना व कुटुंबाचे सहकार्य असल्यामुळे वेगवेगळ्या जबाबदाऱ्या ते पार पाडू शकले. त्यांच्या गुणवत्तेच्या जोरावर डीटीई मुंबईने त्यांना प्राचार्यपदाची मान्यता दिली. त्याच्या यशस्वितेचा आलेख पुढे पुढे वाढतच गेला. राज्यस्तरीय तंत्रज्ञान स्पर्धा, आझादी का अमृत महोत्सव मध्ये वेगवेगळ्या स्पर्धा, एमएसबीटीई च्या शैक्षणिक चर्चासत्रात सहभाग, पुणे येथे इंटरनॅशनल कॉन्फरन्समध्ये सहभाग, एमएसबीटीई च्या अनेक महत्त्वाच्या चर्चासत्रांत सहभाग, कोल्हापूर येथे एनबीए च्या राज्यस्तरीय कार्यशाळेत सहभाग, महाराष्ट्रातील अनेक पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये बाह्य शैक्षणिक निरीक्षणासाठी काम पाहिले, मराठीतील पॉलिटेक्निक शिकवण्याची प्रक्रिया MSBTE समिती सदस्य, चोपडा, धरणगाव, नाशिक, धुळे , बीड, जालना, इत्यादी महाराष्ट्रातील अनेक कॉलेजमध्ये बाह्य संस्था देखरेख समितीचे अध्यक्ष, सीएसआर योजनेअंतर्गत स्कोडा ऑटो लि. करिता सदस्यता, 94.3 साठी पुरस्कारार्थी म्हणून माय एफएम उद्योजक आणि उत्कृष्टता पुरस्कार-2017, देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे 13 देशांच्या युवा रोजगारक्षमता परिसंवादासाठी सशक्त वातावरण निर्माण करण्यासाठी सन्माननीय अतिथी आणि वक्ते म्हणून आमंत्रित, अनेक सेमिनार, करिअर फेअरसाठी प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित, मुख्य समन्वयक, MSBTE प्रकल्प स्पर्धा 2016-17, "VISION- POLYTECH" 2K16 च्या उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित, महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्यासोबत पॉलिटेक्निक असोसिएशनचे प्रादेशिक सचिव म्हणून बैठकीत उपस्थित, 2016 मध्ये दुबई येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभाग, अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सादरीकरण. मॉनिटरिंगच्या विश्लेषणासाठी एमएसबीटीईच्या प्रादेशिक समितीचे सदस्य, साखर संकुल पुणे येथे एआयसीटीई अध्यक्षांसह पॉलिटेक्निकच्या व्यवस्थापनाच्या संघटनेचे कार्यकारी सदस्य म्हणून प्रतिनिधित्व, चेन्नई येथे तांत्रिक शिक्षणावर जागतिक शिखर परिषद विषय - वर्तमान परिस्थिती आणि भविष्यातील संभावना, इंडो जर्मन टूल रूम येथील मेकॅट्रॉनिक्समधील डिप्लोमासाठी अभ्यासक्रम प्रमाणीकरण सदस्य, विद्यालंकार इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी मुंबई येथे प्रभावी संशोधन पद्धतीवर अल्पकालीन प्रशिक्षण कार्यक्रम, मुख्य समन्वयक लॅब मॅन्युअल विकास समिती MSBTE मुंबई आणि CSMSS पॉलिटेक्निक संभाजीनगर, महाराष्ट्र आणि गोवा राज्यस्तरीय ISTE अधिवेशनासाठी सदस्य, राज्यस्तरीय पेपर सादरीकरणासाठी प्रमुख पाहुणे गव्ह. पॉलिटेक्निक संभाजीनगर, जिल्हाधिकारी कार्यालय आणि सहसंचालक कार्यालय औरंगाबाद यांचे व्हिजन डॉक्युमेंटसाठी सदस्य इत्यादी अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या प्राचार्य डोंगरे पार पाडत आहेत. प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे यांना आतापर्यंत पुढील पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे... 1. "रोल ऑफ ऑनर" लायन्स क्लब संभाजीनगर क्लासिक तर्फे. 2020 मध्ये. 2. "उत्कृष्ट शैक्षणिक आणि उद्योग संस्था परस्परसंवाद अवॉर्ड", माय FM 94.3 तर्फे 2017 मध्ये. 3. "माय कॅम्पस स्टार" माय FM 94.3 तर्फे 2019 मध्ये. 4."उत्कृष्ठ कोविड वॉरियर" म्हणून छत्रपती संभाजीनगर महानगर पालिकेतर्फे 2020 मध्ये. 5. अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ पॉलिटेक्निक महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे 2020 मध्ये "विशेष बहुमान". प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे यांच्या शैक्षणिक कार्याची घौडदौड अविरतपणे सुरू आहे. त्यांच्या या यशाला दैनिक आधुनिक केसरीतर्फे मानाचा मुजरा व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

# भाजपच्या आमदाराने कोव्हिडच्या काळात मेलेल्या व्यक्तीच्या नावे पैसे काढले


## प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचा विधानसभेत खळबळजनक आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज विधानसभेतील चर्चेदरम्यान आरोग्य विभागाचे धक्कादायक प्रकरण बाहेर काढले. भाजपच्या एका आमदाराने कोव्हिड महामारीच्या काळात मेलेल्या व्यक्तींना जीवंत दाखवून शासनाच्या सवलतींच्या माध्यमातून पैसे काढल्याचा खळबळजनक आरोप त्यांनी केला आहे. जयंत पाटील सभागृहात म्हणाले की, कोविडच्या काळात एका हॉस्पिटलने मृत रुग्ण जीवंत दाखवून शासनाच्या सवलतींचा लाभ घेत त्या सवलतीची पैसे खाल्ले आहेत. आणि यात धक्कादायक बाब ही आहे या प्रकरणात मुख्य आरोपी हे आपल्या सभागृहाचे एक सदस्य आहे आणि विशेष बाब म्हणजे ते सत्तेत महत्त्वाची पदे भूषवणाऱ्या व्यक्तींचे निकटवर्तीय मानले जातात. सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील मौजे मायणी येथे श्री छत्रपती शिवाजी एज्युकेशन सोसायटी कोल्हापूर या संस्थेच्या अंतर्गत इन्स्टिट्यूट ऑफ द मेडिकल सायन्स अँड रिसर्च सेंटर या नावाने वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आहे. सन २०२० मध्ये देशभरात कोरोना रोगाचा संसर्ग व फैलाव झाला होता. कोव्हीड - 19 च्या रुग्णांवर उपचार करताना या रुग्णालयाचे तत्कालीन अध्यक्ष, सचिव, खजिनदार व इतरांनी महात्मा ज्योतिबा फुले योजनेमध्ये स्वतःचा फायदा करून घेण्यासाठी अनेक मयत लोकांना जिवंत दाखवून त्यांच्यावर उपचार केल्याचे आढळून आले आहे.



**महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ मिळावा म्हणून बोगस डॉक्टर दाखवले** : आधी या रुग्णालयाने महात्मा फुले जनआरोग्य योजनेसाठी करारनामा करताना बोगस डॉक्टर दाखवले आहे . यातील डॉक्टर नमुद काळात सदर रुग्णालयात कार्यरत नव्हते व त्यांनी कोणत्याही रुग्णांवर कोणत्याही प्रकारचे उपचार केलेले नाहीत . उदा . डॉ .शशकिांत कुंभार यांनी या हॉस्पीटलची ज्यावेळी चौकशी करण्यात आली होती त्यावेळी चौकशी समतिीला असे लहिुन दलि आहे की, मी या हॉस्पीटलमध्ये कार्यरत नाही . असे एकुण 46 डॉक्टर आहेत . रुग्णालयाच्या बॉडीने स्वत :च्या फायद्यासाठी सदर डॉक्टर्स रुग्णालयात उपचारासाठी नसतानाही डॉक्टरांची नावे दाखवली आहेत . तसेच सातारा जिल्हा परिषद यांच्याकडे रुग्णालय नुतनीकरणासाठी संस्थेच्या संचालक मंडळाचा कोणताही ठराव न घेता, खोटी कागदपत्रे दाखवून, बोगस डॉक्टर दाखवून 300 बेडचे रुग्णालय नुतनीकरण करून सदर नुतनीकरण प्रमाणपत्र हे महात्मा फुले जनआरोग्य योजनेशी करार करताना जोडून शासनाची व संस्थेची मोठ्या प्रमाणात फसवणूक केली .





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


या सगळ्यांसोबत आपले छंदही जपण्यास त्या विसरल्या नाहीत. त्यांना लहानपणी पियानो वादनाची आवड होती. पण वेळेअभावी त्यात प्राविण्य मिळवता आले नव्हते. पण आता त्यांनी ट्रिनिटी कॉलेज ऑफ लंडन ची पियानोची ग्रेड फोरची परीक्षा दिली आणि ती त्या चांगल्या प्रकारे उत्तीर्णही झाल्या. नैसर्गिक शेतीचा प्रयोगही त्यांनी नुकताच सुरु केला आहे. त्यासाठीही त्या वेळ देतात. आपल्या शेतात त्यांनी एक हजार झाडे लावली आहेत. या झाडांना बाहेरून कोणतेही कृत्रिम खत न देता नैसर्गिक वातावरणात, नैसर्गिक खत देऊन वाढवण्याचा प्रयोग त्या करीत आहेत. त्यासोबतच पर्यावरण जपण्यासही त्या हातभार लावत आहेत. त्या म्हणतात, ' आज हवा, पाणी आणि अन्न या गोष्टी मोठ्या प्रमाणावर प्रदूषित झाल्या आहेत. पण आपल्याला त्या जशा आहेत तशा सगळ्यांसोबत शेअर कराव्या लागणार आहेत. म्हणूनच नागरिक म्हणूनही आपलीही वैयक्तिक काही जबाबदारी येते. पर्यावरणाची काळजी घ्यायला आपण स्वतःपासून सुरुवात करायला हवी. ' या सगळ्या गोष्टींसाठी त्या वेळ कसा काढतात हे एक कुतूहलच आहे. पण त्यांना या बाबतीत विचारले असता त्या म्हणतात, ' वेळेचे नियोजन ( टाईम मॅनेजमेंट )महत्वाचे आहे.



## हितगुज

पुष्प १११वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## वृक्षवल्ली आम्हा...

भारतीय माणूस अग्नी, प्रकाशाचा चाहता, आकांक्षी आहे. म्हणूनच सूर्य अनेकानेक प्रतीकार्थांनी त्याच्या दैनंदिन जीवनाशी एकरूप झाला आहे. या भूमीत प्रत्येक मानवात एक संतत्व लपलेले आहे. प्रत्येक संतात एक माणूस जागत असतो. म्हणूनच या दोन्हीतून निर्धन, फाटक्या जगण्याला मौल्यवान दृष्टी रत्नांची भरजरी झालर सहजपणे लाभली आहे. त्यामुळेच भारतीय माणसाचे अंतःकरण, आत्मा फक्त स्वतःपुरता मर्यादित नसून विश्वात्मक होण्याच्या तळमळीने व्याकुळ होत असतो. माझ्यात सर्व व सर्वात मी, अशा प्रकारची वैश्विकता-बुद्धी सक्रीय झाल्यावरच भारतीय मनाला पूर्ण सुखाचा आनंद अनुभवता येतो. संत तुकाराम - 'वृक्ष वल्ली आम्हां सोयरे, वनचरे' म्हणत सर्व सृष्टीला आपल्या भक्ती सुखात सहभागी करून घेतात. संत सावता, 'कांदा-मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी ॥' म्हणत प्रकृती, निसर्गाच्या प्रवाहमान चेतन सत्तेला दैनंदिन जगण्याशी जोडतात. . विष्णुमय जगतात जगण्याला सुंदरता देणारा, तप बनवणारा, मनाला वश करणारा, संजीवनी प्राणशक्ती देणारा वृक्ष अर्थात वटवृक्ष सावित्रीच्या तेजाने लोकोपकारक बनला आहे.म्हणून त्याची पूजा आम्ही करतो इतकी उदारता आमच्यात आहे.जसा मुक्ताईच्या अनुग्रहाने अहंकारी वटेश्वर चांगदेवाचा संत चांगदेव झाला, तसाच हा वृक्ष सावित्रीच्या तेजाचा, प्राणशक्तीचा, त्यागनिष्ठेचा, अगाध बुद्धी सामर्थ्यांचा वाहक बनला आहे. महाकालाचा स्पर्श घेऊन चिरंतन बनलेल्या वटवृक्षाचे जीवनाशी नाते अनेक अर्थ संदर्भाच्या धाग्यांनी जोडलेले आहे. ते धागे उकलून शाश्वत मतितार्थ शोधणे, हे सणवार, व्रत, वैकल्याचे सुंदर देणे असेल, ते देण्याघेण्यासाठी निश्चितच तत्पर व्हावे.

## गहिनीनाथ

आधुनिक केसरी

मच्छिंद्रनाथांस मुलांनी दुरून ठिकाण दाखविले होतेच. तेथून एक मुलाचा शब्द त्यास ऐकू येऊ लागला. तेव्हा हा करभंजन नारायणाचा अवतार झाला, असे मच्छिंद्रनाथाने समजून मुलास उचलून घेतले व तो मार्गाने चालू लागला. गोरक्षनाथाने पुतळा केला असूनहि तो जवळ दिसेना, म्हणून मच्छिंद्रनाथ मुलास घेऊन जात असता, गोरक्षनाथास हाका मारीत चालला. ती गुरूची हाक ऐकून गोरक्ष एका घरात लपला होता तेथून बाहेर आला. पण मच्छिंद्राच्या हातातील मुलास पाहताच त्यालाहि भीति वाटली. त्याची गुरूजवळ येण्यास हिंमत होईना. हे पाहून गोरक्षास भय वाटते असे मच्छिंद्रनाथ समजले. मग त्याने मुलास चिरगुटात गुंडाळून ठेविले व गोरक्षापाशी जाऊन सांगितले की. हा मनुष्य आहे व तो नवनारायणापैकी एक नारायणाचा अवतार आहे. मग गोरक्षानेही कसा काय प्रकार झाला होता तो सांगितला तेव्हा ते वर्तमान ऐकून मच्छिंद्रनाथांसआनंद झाला जसा तू गोवरामध्ये झालास तसाच तू संजीवनी मंत्र म्हणून हा पुतळा केलास. त्यात करभंजन नारायणाने संचार केला आहे; तो भूत नसून मनुष्य झाला आहे, अशी साद्यंत हकीगत सांगून मच्छिंद्रनाथाने गोरक्षाची भीति उडविली मग त्यासहवर्तमान मुलास घेऊन मच्छिंद्रनाथ आपल्या आश्रमास गेला तेथे त्याने गाईचे दूध आणून मुलास पाजिले व त्यास झोळीत घालून हालवून निजविले.



यापमाणे प्रकार घडल्याची बातमी गावभर झाली. तेव्हा गावचे लोक भेटीस जाऊन मुलाची चौकशी करीत तेव्हा नाथहि सर्व वृत्तांत सांगत; तो ऐकून त्यांना नवल वाटे. मच्छिंद्रनाथाने आपल्या शिष्याकडून मातीचा पुतळा जिवंत करविला, ह्यास्तव ब्रह्मदेवापेक्षा मच्छिंद्रनाथाची योग्यता विशेष होय, असे जो तो बोलू लागला. तेथून पुढे तीर्थयात्रा करीत फिरताना मुलासहि बरोबर नेणार असा मच्छिंद्राचा मानस पाहून, त्यामुळे मुलाची अनास्था होईल मुलाचे आईवाचून संरक्षण व्हावयाचे नाही, म्हणून मुलास कोणाच्या तरी हवाली करा, असे पुष्कळांनी मच्छिंद्रनाथांस सुचविले. ते ऐकून, तसे होईल तर फारच चांगले होईल असे नाथाने उत्तर दिले. अशा तऱ्हेने मच्छिंद्रनाथांचा रुकार मिळाल्यानंतर मुलास कोणाच्या तरी माथी मारावा असा गावकऱ्यांनी घाट घातला. मग मधुनाभा या नावाचा एक ब्राह्मण तेथे राहात होता. त्याची गंगा ह्या नावाची स्त्री महापतिव्रता होती. उभयता संतती नसल्याने नेहमी रंजीस असत व त्यांस कोणत्याच गोष्टीची हौस वाटत नसे. ते दोघे ह्या मुलाचा प्रतिपाळ आस्थेने करतील असे जाणून त्यांच्याबद्दल सर्वांनी मनापासून मच्छिंद्राकडे शिफारस केली. मग अशा लोकप्रिय स्त्रीपुरुषांच्या हातात गहिनीनाथांसारखे रत्न देणे नाथासहि प्रशस्त वाटले. त्याने मुलास गंगाबाईच्या ओटीत घातले.



आधुनिक केसरी

## मुक्तीचा उमाळा | अन्य नाही ||

बांधुनी इमले | जगी थोर झाला ||
परि अडकला | विकारात ||१||
काय उपयोग | रित्या विहीरीचा ||
फुकाच मोटेचा | येरझार ||२||
वाचाळ मुखासी | कैसे यावे नाम ||
त्याचे भाळी राम | कैसा भेटे ? ||३||
पुण्यवंता लाभे | सात्विक वर्तन ||
नामसंकीर्तन | ब्रह्मसुख ||४||
पहावा दिंडीत | भक्तीचा सोहळा ||
मुक्तीचा उमाळा | अन्य नाही ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**ध्यान दशा तन्मय भया,
सच्चिदानन्द स्वरुप ।
यह तो अन्त समाधि है, ज्ञान न आतम
रुप ।।२७।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल
दशम अध्याय) ०२/१०/२७**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
**ध्यान करता-करता जेव्हा ध्याता ध्येय स्वरूप होतो, तेव्हा जीव ब्रह्म-साधर्म्यास प्राप्त करून सच्चिदानंद स्वरूप होऊन जातो. ध्यानाची अंतिम अवस्था समाधी आहे, ज्या काळात जीव लोह-अग्निवत् ब्रह्माच्या स्वरूपास प्राप्त होतो. समाधीत आत्मास स्व-स्वरूपाचेही ज्ञान रहात नाही. सर्व चेतना ध्येयात लावून आत्मा ध्येय स्वरूप होऊन जातो, त्याला स्वतःची कुठलीच शुद्ध रहात नाही.**



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## संत वेणाबाई


आधुनिक केसरी

समर्थ मिरजेला आणि कोल्हापूरला नेहमी जात. तिथे त्यांची नेहमी कीर्तने होत. वेणाबाई त्यांच्या कीर्तनांना आवर्जून जात. त्यांचे आई-वडील समार्थांचेच अनुगृहीत होते. तर सासू-सासरे एकनाथ महाराजांचे अनुगृहीत होते. कोल्हापुरातील मंडळींची मजल तर वेणा बाईंना विषप्रयोग करण्यापर्यंत गेली. वेणा बाईंनी विष पचवून दाखवले. निंदकांना पश्चात्ताप झाला. त्यांनी वेणाबाई आणि समर्थांची क्षमा मागितली. प्रारंभी कणखर मनाने जननिंदा सोसणाऱ्या वेणा बाईंनी कोमल अंतःकरणाने सर्वांना क्षमा केली.[३] समर्थ प्रत्येक रामनवमी उत्सवाच्या आधी निवडक शिष्य घेऊन भिक्षेसाठी जात असत. त्या काळात एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीला चाफळात ठेवून उत्सवाची सर्व जबाबदारी त्याच्यावर सोपविली जात असे. एक वर्ष ही जबाबदारी वेणास्वामींच्यावर सोपविण्यात आली. उत्सवासाठी सगळ्या प्रकारची धान्ये निवडून ठेवणे, लोणची, चटण्या, सांडगे, पापड, मेतकुट या सर्व गोष्टी सिद्ध ठेवणे, समर्थांनी पाठवलेली भिक्षा कोठीघरात व्यवस्थित लावून ठेवणे अशी विविध कामे करावी लागत. ऐन उत्सवाच्या १५ दिवस आधी वेणाबाई आजारी पडल्या. त्या तापाने एवढ्या फणफणल्या की त्यांना चालताही येईना. राम-मंदिरातील खांबाला धरून मोठ्या मुश्किलीने त्यांनी रामाजवळ करून भाकली. वेणाबाईंची ही केविलवाणी अवस्था पाहून चाफळातील राममूर्तीच्या डोळ्यांत अश्रू आले आणि काय आश्चर्य! विठ्ठलाने ज्याप्रमाणे नाना रूपे धारण करून संत जनाबाई, संत एकनाथ, या संतांची सेवा केली त्याप्रमाणे रामचंद्रांनी रामबाईंच्या रूपात येऊन उत्सवाची सर्व तयारी केली. 'मी बत्तीस शिराळ्याची असून रामदास स्वामींनी मला तुमच्या मदतीसाठी पाठविले आहे'. असे रामाबाईंनी वेणाबाईंना खोटेच सांगितले. समर्थ भिक्षेहून परतल्यावर सर्व गोष्टींचा उलगडा झाला आणि रामाबाई ही गुप्त झाल्या. वेणाबाईंची समाधी सज्जनगड येथे आहे.[४] सीतास्वयंवर वगैरे काही स्वतंत्र ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. सीतेचे स्वयंवर वेणाबाईंच्या पूर्वी आणि नंतर अनेकांनी वर्णिले आहे.

## नाम घेण्याचा निश्चय करावा

आधुनिक केसरी

जे दृश्य असते ते आज ना उद्या नाश पावते. दृश्य हे स्वतंत्र नसते, भगवंताच्या अधीन असते. म्हणून, जगात जी जी गोष्ट घडते ती ती भगवंताच्या इच्छेनेच घडते हे आपण ओळखावे. आपला देह दृश्यच आहे, आणि त्याला चालविणारा भगवंत देहात आहे; त्याच्या अनुसंधानात राहण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. हे अनुसंधान राहणे भगवंताच्या नामाने साधते, म्हणून तुम्ही सर्वांनी नाम घेण्याचा निश्चय करावा. आपले चित्त नामामध्ये गुंतले म्हणजे देहाला प्रारब्धाच्या स्वाधीन करता येते. ही युक्ती ज्याला साधली त्याला सुखदुःखाची बाधा उरली नाही. संतांना देखील त्यांचे प्रारब्ध भोगावे लागते, पण त्यांना देहबुद्धी नसल्याने भोगाचे सुखदुःख नाही. व्यवहाराच्या मार्गाने जात असता भगवंताचे नाम कधी विसरू नये. आपल्या प्रयत्नाला जे फळ येईल ती भगवंताची इच्छा समजून, जे पदरात पडेल त्यात समाधान मानावे. आपण प्रपंची लोक आहोत, म्हणून प्रपंचाला उचित असणारा प्रयत्न केल्यावाचून कधी राहू नये;



पण प्रपंच हेच आपले सर्वस्व आहे असे न समजता, त्यामध्ये भगवंताला विसरू नये. परमार्थाला सदाचरणाची फार जरुरी आहे. उगीच भलत्याच्या सांगण्याला भुलू नये, आणि अनीति-अधर्माच्या मार्गाला जाऊ नये. संत जे सांगतात त्याच्यावर विश्वास ठेवून, मुखात नाम ठेवावे आणि सदाचरणाने वागून प्रपंच करावा. असे जो वागेल त्याचे कल्याण राम खात्रीने करील हे मी सर्वांना वचन देतो. बहुतेकांना प्रपंचासाठी देव पाहिजे असतो. खरोखर, हे सर्व हिंग-जिऱ्याचेच गिऱ्हाईक आहेत; देवासाठी देव पाहिजे असे म्हणणारा खरा कस्तुरीचा चाहताच कोणी भेटत नाही. जो बरा होणार नाही अशा रोग्याला बरा करतो तो डॉक्टर खरा. अगदी विषयातल्या माणसांनासुद्धा जो बाहेर काढतो तो संत खरा. त्याच्याजवळ जाऊन नुसते ' मी शरण आलो आहे ' असे म्हटले तरी पुरे होते. हल्लीच्या आणि पूर्वीच्या प्रपंचात तसा फरक नाही; पण पूर्वी लोक देवाला विसरत नसत, अलीकडे ते जास्त संकुचित झाले आहेत. पूर्वी खेडेगावांमध्ये स्वाभाविकपणे एकमेकांच्या उपयोगी पडावे अशी बुद्धी असायची, पण आता काळ पालटला आहे. तुम्हा इतक्या लोकांना नामस्मरण करताना पाहून मला एक समाधान वाटते की, मला जी गोष्ट आवडते ती इतक्या लोकांना आवडू लागली आहे. मी सांगितलेले तेवढे करीन असा निश्चय करा. कशाचीही काळजी करू नका, मी तुमचा भार घेतलेला आहे ही जाणीव ठेवून आनंदाने प्रपंच करा.

**१९१. भगवंताच्या नामाचा नाद लागला तर दुःखाची जाणीव कमी होईल. दुःखाची जाणीव नसल्यावर, दुःख असले म्हणून बिघडले कुठे ?**

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, १० जुलै २०२४

adhunikkesari.com


# अमृत महोत्सवानिमित्त घाडगे यांचा सत्कार

## आमदारकीपेक्षा शिक्षक महत्त्वाचा : सी.आर. घाडगे


आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** येथील जिल्हा परिषद प्रशालेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक सी.आर.घाडगे यांचा कौटुंबिक व समाजातील विविध क्षेत्रातील तसेच सामाजिक संघटनांनी एकत्र येत त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षाचा सत्कार करण्यात आला. पूज्य "भंते सारीपुत्त" सोलापूर यांनी वंदना, त्रिसरण, पंचशील देऊन धम्म प्रवचनातून सामाजिक उदबोधन केले आणि घाडगे सरांचे अभिष्टचिंतन केले. संपन्न झालेल्या कार्यक्रमात अनेक आठवणी उपस्थित मान्यवरांनी सांगितल्या व त्यामध्ये त्यांनी आज तागायत सातत्य कसे ठेवले याविषयी मनोगत व्यक्त केले .त्यांच्या विद्यार्थी दशेतील महाविद्यालय प्रतिनिधी सी.आर ते समाज प्रतिनिधी सी.आर.असा प्रवास उलगडण्यात आला.

यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक डी. के. कुलकर्णी, मुख्याध्यापक संघाचे सुरेश टेकाळे, महादेव महाराज अडसूळ, रोहिले बाप्पा, ज्येष्ठ साहित्यिक के.व्ही.सरवदे, सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष गायकवाड, मारुती दादा गायकवाड, मा. उपप्राचार्य डॉ. शंकर कांबळे, मिलिंद गायकवाड, डॉ. बबन कांबळे, संतोष भोजने, बाबासाहेब उबाळे, जोशाबा पतसंस्थेचे मा. संचालक सी.बी.आल्टे, संजय धावारे, शरद धावारे,राजू धावारे,शांताबाई धावारे,हिराचंद माळी, ज्येष्ठ नागरिक शीलवंत बप्पा, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा नेते अनिल बापू हजारे, मा. मुख्याध्यापक सुलभा कुलकर्णी, पत्नी वत्सलाताई घाडगे,मुले रंजन, केतन, राजू,मुली स्वाती,प्रांजली जावई सुरेश धावारे बाळासाहेब वाघमारे,सुना,नातवंडे असा



परिवार उपस्थित होता. आ. कैलास पाटील, सिनेट सदस्य प्रा. डॉ. संजय कांबळे,सभापती शिवाजी कापसे व इतर मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्तींनी कडू गोड आठवणींचा व संघर्षाचा उलगडा केला. संघटनात्मक व प्रशासकीय अनुभव खूप असल्याने सुमारे तीस वर्षांपूर्वी रोहिले बप्पा व त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्याआमदारकी साठी तालुक्यातील ग्रामपंचायतीचे ठराव घेतलेले होते. त्याच बळावर काँग्रेस व शेतकरी कामगार पक्षाने तिकीट देण्याची तयारी दर्शवली होती. परंतु नोकरीमुळे आपण हा निर्णय घेतला नाही ही आठवण कथन करून यापुढेही आपण सामाजिक हित जपण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. प्रास्ताविक माध्यमिक शिक्षिका असलेल्या त्यांच्या कन्या स्वाती धावारे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संस्कार प्रमुख लक्ष्मण धावारे यांनी केले तर आभार महेंद्र रणदिवे यांनी मानले.




# ग्रामसेवक, सरपंचांच्या खोट्या सह्या करून प्रमाणपत्रांचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** सोबलगाव, पाडळी ग्रुप ग्रांमपंयातमध्ये धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ग्रामसेवक, सरपंचाच्या सह्या मारून बोगस प्रमाणपत्राचे वाटप केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत पाडळीच्या सरपंच जनाबाई वाघ यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. सोबलगाव, पाडळीचे ग्रुप ग्रामपंचायतचे संगणक ऑपरेटर प्रल्हाद आहेवाड यांनी खोट्या सह्या मारून प्रमाणपत्र दिल्याचा आरोप सरपंच वाघ यांनी केला आहे. प्रल्हाद आहेवाढ यांनी १ जून रोजी निकिता आहेवाढ खोट्या सह्या मारून प्रमापत्र वाटप केल्याचं वाघ यांचे म्हणणे आहे. तर "कोणीही खोट्या सह्या शिक्के वापरून प्रमाण पत्राचे वाटप करणे चुकीचं आहे. मी कोणालाही माझी सही मारून प्रमाणपत्र देण्याचं सांगितले नाही". असल्याचे ग्रामसेवक जे पठाण यांनी सांगितले तक्रार देऊन सुद्धा काहीच कारवाई अद्याप झालेली नाही.

# श्री सिध्दीविनायकाच्या दर्शनाने राष्ट्रवादीने फोडला विधानसभा प्रचाराचा नारळ

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस अधिक मजबूत करण्यासाठी आणि येत्या काही दिवसात महाराष्ट्रात प्रचाराचे झंझावाती दौरे सुरु करणार असल्याने त्याची सुरुवात म्हणून आज माझ्या सर्व मंत्री आमदार आणि पदाधिकाऱ्यांसमवेत श्री सिध्दीविनायकाचे दर्शन घेतल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली. सोमवारी पक्षाच्या बैठकीत निर्णय झाल्यानंतर आज सकाळी अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे खासदार, आमदार, मंत्री व पदाधिकारी पक्ष कार्यालयात एकत्र जमून बसने श्री सिध्दीविनायकाच्या दर्शनाला दाखल झाले. आम्ही जनतेसमोर त्यांचे आशिर्वाद मागण्यासाठी जात आहोत. सिध्दीविनायकाने आम्हाला आशिर्वाद द्यावेत त्यासाठी विजयाची खूण दाखवली आहे. शेवटी जनता - जनार्दन सर्वकाही असते. लोकांचा विश्वास पुन्हा संपादन करण्यासाठी त्यांच्यासमोर जाणार आहोत असेही अजितदादा पवार यांनी सांगितले. चांगल्या कामाची सुरुवात ही गणरायाच्या दर्शनाने केली जाते आणि अंगारकी असल्याने माझ्या पक्षाचे आमदार, मंत्री आणि पदाधिकारी यांना घेऊन दर्शनाला आलो आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे, अनिल पाटील, धर्मरावबाबा आत्राम, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री अदितीताई तटकरे, प्रमोद हिंदूराव, शिवाजीराव गर्जे, सुरज चव्हाण, मुंबई कार्याध्यक्ष नरेंद्र राणे, प्रदेश प्रवक्ते संजय तटकरे, वैशाली नागवडे, लतिफ तांबोळी, महिला नेत्या सुरेखाताई ठाकरे, सिध्दीविनायक मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष आमदार सदा सरवणकर, विश्वस्त सुनिल गिरी, आरती साळवी आदींसह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.




## आदित्यनाथ ॲक्शन मोडवर

आधुनिक केसरी

उत्तर प्रदेशमधील हाथरस येथे स्वयंघोषित धर्मगुरू भोले बाबाच्या सत्संगात झालेल्या चेंगराचेंगरीत १२१ जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेनंतर देशभरातून या सत्संगाचं आयोजन करणारे लोक आणि भोले बाबाविरोधात संतापाची लाट उसळली. त्यानंतर न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेत एसआयटी चौकशी करण्याचे आदेश दिले होते. एसयाटीच्या पथकाने तीन दिवसांचा तपास आणि तब्बल १२० हून अधिक लोकांच्या चौकशा केल्यानंतर एसआयटीने ३०० पानांचा अहवाल सादर केला आहे. या अहवालात दुर्घटनेची कारणं आणि दुर्घटनेला जबाबदार असलेल्या लोकांची नावं नमूद करण्यात आली आहेत. हा अहवाल हाती पडताच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ ॲक्शन मोडवर आहेत. उत्तर प्रदेश सरकारने उपविभागीय दंडाधिकाऱ्यांसह सहा अधिकाऱ्यांना निलंबित केलं आहे. सर्कल ऑफिसरसह, सिकंदरामाऊच्या तहसीलदारांचाही या निलंबित अधिकाऱ्यांमध्ये समावेश आहे. २ जुलै रोजी नारायण साकार उर्फ विश्व हरी उर्फ भोले बाबा या स्वयंघोषित धर्मगुरूने आणि त्याच्या अनुयायांनी हाथरस येथे सत्संगाचं आयोजन केलं होतं. स्वतः भोले बाबाने या सत्संगाच्या कार्यक्रमात प्रवचन दिलं. मात्र प्रवचन संपवून तो तिथून निघून जात असताना सत्संगाला आलेल्या भक्तांनी त्याला नमस्कार करण्यासाठी त्याच्या कारच्या दिशेने धाव घेतली. हजारो लोक एकाच वेळी त्याच्या कारच्या दिशेने धावू लागले आणि त्याच वेळी धक्काबुक्की आणि चेंगराचेंगरी झाली. यात १२१ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये महिला आणि लहान मुलांची संख्या अधिक होती. दरम्यान, हाथरस चेंगराचेंगरी प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयाच्या पटलावर गेलं असून सर्वोच्च न्यायालयात यावर सुनावणी होणार आहे. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली असून न्यायालयाने ही याचिका स्वीकारली आहे.



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

## शांघाय शिखर परिषद : अस्तानाचा संदेश

आधुनिक केसरी

**शांघाय सहकार्य संघटनेची अस्ताना शिखर परिषद ही युरेशियन देशांच्या सामाजिक, आर्थिक विकासाच्यादृष्टीने एक महत्त्वपूर्ण उपलब्धी आहे. चीनच्या वन बेल्ड वन रोड पुढाकारा जागरूकपणे प्रतिशह देताना सावध असणे गरजेचे आहे. यादृष्टीने सीमा प्रश्नाबाबत पंतप्रधान मोदी यांनी अनुपस्थित राहून चीनला इशारा दिला आहे. दहशतवाद विरोधात सामुदायिक एल्गार आणि अंमली पदार्थ विरोधी मोहिम हे सुद्धा या परिषदेचे फलित होय.**

शांघाय शिखर परिषद ही संघटना केव्हा स्थापन झाली, तिचा इतिहास काय, तिचे वर्तमान काय याबद्दल थोडे मागे वळून पाहिले असता काही तथ्ये समोर येतात. १९९१ साली सोव्हिएट रशिया कोलमडल्यानंतर सभोवतीच्या चार प्रमुख देशामध्ये रशिया विरोधी हवा तयार होऊ नये व तेथील अतिरेकी गट रशियाच्या विरोधात काही काम करू नये म्हणून त्यांना सांभाळण्यासाठी या शिखर परिषदेचा जन्म झाला. शांघाय सहकार्य शिखर संघटना ही एक युरेशियन राजकीय आर्थिक तसेच आंतरराष्ट्रीय सुरक्षा आणि संरक्षणावर भर देणारी संस्था आहे. २००१ मध्ये चीन आणि रशियाच्या पुढाकाराने ती स्थापन झाली आहे. भौगोलिकदृष्टीने तिची व्याप्ती आणि लोकसंख्या पाहता ही जगातील सर्वात मोठी प्रादेशिक संघटना आहे. तिचे क्षेत्रफळ अंदाजे जगाच्या भूभागापैकी ८० टक्के एवढे आहे. एकूण लोकसंख्येच्या ४० टक्के एवढे लोक या क्षेत्रात राहतात. २०२३ पर्यंत या सर्व देशाचा जीडीपी हा एकूण जगापैकी ३२ टक्के एवढा आहे. परस्पर सुरक्षा, मजबूत राजकीय व आर्थिक सहकार्य यावर भर देणारा हा एक प्रादेशिक मंच आहे. एकूण १० सदस्य आणि १४ संवाद भागीदार व एक निरीक्षक असा या संघटनेचा व्याप आहे. अतिथी उपस्थिती म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाचे अधिकारीही या बैठकीस हजर राहतात. दरवर्षातून एकदा भरणारी ही प्रादेशिक शिखर संस्था दहशतवाद विरोधात संरचना उभी करून कार्य करीत आहे. १९९६ मध्ये शांघाय - ५ म्हणून ही संघटना उभी राहिली. मास्को येथे झालेल्या बैठकीत १९९७ मध्ये सर्व देशांनी सीमावर्ती भागातील लष्करी शक्ती कमी करण्याचा निर्णय घेतला. १९९७ मध्ये बहुद्देशीय जग या घोषणेवर सह्या करण्यात आल्या. कझाकिस्तानची राजधानी अस्ताना येथे पार पडलेली शांघाय शिखर परिषद ही अनेक दृष्टीने महत्त्वाची आहे. विशेषतः रशिया, चीन आणि पूर्वीच्या सोव्हिएट रशियातील फुटून निघालेले कझाकिस्तान, ताझिकिस्तान, उझबेकिस्तान हे देश यांच्यासह भारताचा या परिषदेतील सहभाग अनेक दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी या परिषदेत भाग घेतला आणि त्यांनी या परिषदेमध्ये चीनच्या परराष्ट्रमंत्र्याबरोबर चर्चाही केली. या परिषदेमध्ये आशियाई देशांच्या परस्पर सहकार्याच्यादृष्टीने २० पेक्षा अधिक मौलिक करार करण्यात आले. अमेरिका आणि युरोपिय राष्ट्रांच्या प्रभावाला झुगारून देण्यासाठी आशियाई देशांनी तयार केलेल्या ब्रिक्स प्रमाणेच एससीओ या मंचाचेही विशेष महत्त्व आहे. परस्पर सुरक्षा सहकार्य, लष्करी उपक्रम तसेच आर्थिक सहकार्य आणि सांस्कृतिक आदानप्रदान, पर्यटनाला चालना या सामुदायिक उपक्रमावर भर दिला जातो. त्यामुळे अस्ताना परिषदेत झालेल्या चर्चेचे सार समजावून घेणे अगत्याचे ठरते. शांघाय शिखर परिषदेतील सर्व राष्ट्रांपुढे एक समान आव्हान आहे ते म्हणजे दहशतवादाचे. त्यामुळे दहशतवादाशी एकदिलाने एकत्रितपणे लढण्याचा संकल्प या परिषदेमध्ये पुन्हा एकदा करण्यात आला. तसेच जागतिक हवामान बदलामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांना तोंड देण्याबाबतसुद्धा धोरण निश्चित करण्यात आले आहे. चीनची पर्यटन आणि सांस्कृतिक राजधानी असलेल्या क्विंगदाओ या शहरात पुढील वर्षी ही शिखर परिषद होणार आहे. या शांघाय शिखर परिषदेची यशस्विता पुढील काही पैलूंवरून प्रामुख्याने जाणवते. पहिले म्हणजे नवीन सदस्य म्हणून बेलारुसला मान्यता देण्यात आली. आता या संघटनेतील हा देश दहावा सदस्य बनलेला आहे. शांघाय शिखर परिषदेच्या या २४ व्या बैठकीमध्ये सर्व सदस्य राष्ट्रांनी एकमताने अस्ताना घोषणापत्रावर स्वाक्षऱ्या केल्या. या घोषणापत्राचे सूत्र काय असेल तर ते दहशतवादाविरुद्ध सामुदायिक एल्गार असेच म्हणावे लागेल.

**चीनला जबर प्रतिशहः** भारत आणि शेजारच्या राष्ट्रामध्ये अशा प्रकारे सर्व समान समस्यांना समर्थपणे सामना करण्याचे धोरण स्विकारण्यात आले. चीनने प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरून सैन्य माघारी घ्यावे आणि शांततेसाठी सामुदायिक प्रयत्न करावेत. तसे केल्याशिवाय नुसत्याच फुकाच्या शांततेच्या गोष्टी काही कामाच्या नाहीत. या पूर्वी चिनी नेत्यांना भारताने ही भूमिका वारंवार समजावून सांगितली. पण तरीदेखील सीमेवरील लष्कराच्या हालचाली काही थांबत नाहीत हे लक्षात घेऊन यावेळी भारताने आळीमिळी गुपचिळी अशी भूमिका न घेता, रोखठोक व ठाम भूमिका घेऊन चीनला एक संदेश दिला आहे. स्वतः पंतप्रधान मोदी या परिषदेत अनुपस्थित राहिले. त्यांनी चीनला असा संदेश दिला आहे की नुसत्या चर्चा नको, प्रत्यक्ष कृती करा. पूर्व लडाख सीमेवरील समस्या सोडविण्यासाठी उभय राष्ट्रांनी लष्करी व सामरिकदृष्टीने चर्चा करून प्रश्न सोडवावेत असे ठरले आहे. भारताच्यादृष्टीने मेक इन इंडिया या आर्थिक धोरणाचे विशेष महत्त्व आहे. भारत मेक इन इंडिया याला एक ग्रोथ इंजिन किंवा विकास वाढीचे जन्नीत्र म्हणून पाहतो आणि याबाबतीत भारताच्या गतिमान अशा विकास योजनांचे लाभ मध्य आशियातील देशांना सुद्धा व्हावेत म्हणून भारताने या योजनांचा प्रसार या परिषदेच्या व्यासपीठावर विचारपूर्वक केला आणि त्यास चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे आशियाई देशामध्ये भारताची आर्थिक ताकद व शक्ती वाढण्यासाठी मदत झाली आहे. रशियाचे अध्यक्ष ब्लादिमोर पुतीन यांनी या परिषदेमध्ये बहुध्रुवी जगात निष्पक्ष अशी एक पर्यायी यंत्रणा उभी करण्यावर भर दिला. त्यांचा रोख अर्थातच अमेरिकेच्या विरोधात होता. परंतु आशियाई राष्ट्रातील परस्पर सहकार्य हे त्यांच्या क्षमता वाढविणारे ठरते हे सूत्र त्यांनी प्रामुख्याने मांडले आहे.

**एससीओचा विस्तारः** २००१ साली शांघाय परिषदेत उझबेकिस्तानला सहावा सदस्य देश म्हणून मान्यता देण्यात आली आणि हळूहळू संख्या वाढू लागली. अफगाणिस्तान, बेलारुस, मंगोलिया या देशांना निरिक्षकांचा दर्जा देण्यात आला होता. सध्याच्या प्रारंभिक संवाद भागीदारांच्या यादीमध्ये अझरबैजान, आर्मेनिया, इजिप्त, कतार, तुर्की, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात, मलेशिया, नेपाळ आणि श्रीलंका या देशांचा समावेश आहे. एससीओ सदस्य राष्ट्रांपैकी भारत आणि चीन यामध्ये सीमा प्रश्नावर मतभेद आहेत. चर्चेच्या १८ व्या फेऱ्यानंतर तणाव कमी करण्यात यश आलेले नाही. त्यामुळे भारताने चीनशी सीमा प्रश्नावर ठाम भूमिका घेतली आहे.

युरेशियामध्ये शांतता प्रस्थापित करणे हे एससीओचे प्रमुख उद्दिष्ट आहे आणि त्यामध्ये एससीओला किती यश आले असा प्रश्न पडतो. काही बाबतीमध्ये एससीओ सदस्य राष्ट्रामध्ये मतभेद जरूर आहेत. परंतु या संघटनेने विकासाबाबत केलेले कार्य नजरेआड करता येणार नाही. भारतासाठी एससीओ महत्त्वाची आहे ती अनेक कारणांमुळे. त्यामध्ये प्रामुख्याने व्यापार, आर्थिक आदानप्रदान, सांस्कृतिक सहकार्य, ऊर्जा सुरक्षा इत्यादी घटकांचा समावेश होतो. शांघाय शिखर परिषदेची वाटचाल पाहता एससीओचे प्रभुत्व दिवसेंदिवस वाढत आहे असे म्हणावे लागेल. सदस्य राष्ट्राच्या एकूण जीडीपीचा विचार करता २३ ट्रिलीयन डॉलर पेक्षा अधिक भांडवल या राष्ट्राकडे केंद्रित झाले आहे. परंतु मजबूत आर्थिक सहकार्याचा पाया अद्यापही घालण्यात आलेला नाही.

भारतासाठी या संघटनेचे महत्त्व काय आहे, कोणत्या कारणामुळे भारत या संघटनेत अधिक स्वारस्य दाखवितो ही बाब समजून घेतली पाहिजे. त्यामध्ये प्रामुख्याने पश्चिम व मध्य आशियात प्रादेशिक सहकार्याचे वातावरण तयार करणे, दहशतवाद विरोधी व्यासपीठ म्हणून सामर्थ्य प्रदान करणे या गोष्टीला विशेष महत्त्व आहे.

भारताच्या संदर्भात विचार करता, चीनची वाढती शक्ती कशी रोखावयाची हा मोठा प्रश्न आहे. शिवाय चीनचा वन बेल्ट वन रोड इनिशिएटिव्ह रोखण्यासाठी भारताला अधिक सावध राहणे भाग आहे. त्यामुळे भारत आपल्या उपक्रमांच्या प्रसारासाठी आणि चीनच्या हालचालीपासून सावध राहण्यासाठी या परिषदेत सहभागी होऊन आपले सामर्थ्य प्रकट करीत आहे. चीन पाकिस्तान यांच्यातील वाढती मैत्री आणि रशिया आणि चीन यांची जोडी याबाबतीत सुद्धा भारताला सावधपणा राखणे भाग आहे. त्यामुळे भारत शांघाय शिखर परिषदेमध्ये जागरूकपणे भाग घेत आहे. आशियातील सुरक्षा आणि सामर्थ्य तसेच प्रादेशिक स्थैर्य याचा विचार करता, चीनच्या आक्रमक धोरणांना तोंड देण्यासाठी भारताने शांघाय शिखर परिषदेत महत्त्वाची भूमिका घेण्यास सुरूवात केली आहे.

**समारोपः** शांघाय शिखर परिषद ही एक महत्त्वपूर्ण उपलब्धी असून भारताने या परिषदेमध्ये बजावलेली कामगिरी ऐतिहासिकदृष्टीने नवी कलाटणी देणारी आहे. चीनला प्रतिशह देऊन आशियाच्या राजकारणात सत्ता समतोलाच्यादृष्टीने एससीओ संघटनेने केलेल्या कार्याचा तपशील पाहता, अस्ताना घोषणापत्र सदस्य राष्ट्रामध्ये सुरक्षा, स्थैर्य आणि विकासाला नवी गती देणारे ठरले आहे. भारताने सावध पवित्रा घेऊन चीनला प्रतिशह दिला आहे आणि या परिषदेतील भारताचा जागरूक सहभाग आपल्या सफल परराष्ट्र धोरणाचे मौलिक फलित होय.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

## जीवनविद्या समजली पाहिजे

आधुनिक केसरी

**जगातील सगळ वैभव ऐश्वर्या असताना देखिल जीवनात अशांती आणि अस्थिरता निर्माण होत असेल तर याचा अर्थ आपल्याला जीवन विद्या समजली नाही अथवा अर्जित करता आली नाही. एकंदरीत गरीब अथवा श्रीमंत कोणीही असो ज्यांच्या जीवनात अस्थिरता, अशांती आहे त्यांनी जीवन विद्या जाणुन घ्यायला हवी.जीवनाचा मतीत अर्थ समजला पाहिजे. मतीत अर्थ समजला तर जीवन हितार्थ लागत आयुष्याचा सार्थक उदेश सार्थकी लागण्यासाठी अथवा योग्य पद्धतीने आयुष्य पुर्ण करण्यासाठी जे काही ज्ञान तत्वज्ञान कामी पडत उपयोगी ठरत ते ज्ञान तत्वज्ञान म्हणजे जीवन विद्या. जीवनाला पुर्णतः मिळावी हाच मुख्यत्वे प्रत्येकाचा जीवन हेतु असतो. परंतु आपल्याला जन्माचा हेतु आपल्याला महित नसल्या कारणाने आपण जीवना विषयी संभ्रमित असतो.**

आणि त्यामुळे स्वतःवर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी अनेक अडचणी निर्माण होतात. स्वतःवर नियंत्रण प्रस्थापित करून यशस्वी जीवन मार्ग पुर्ण करण्याची विद्या हि जीवनात शिकावी लागते आणि हि विद्या कोणत्याही शाळेत विद्यालयात महाविद्यालयात शिकायला मिळतं नाही ती अर्जित करावी लागते. त्यासाठी शिक्षण असलं काय आणि नसलं काय तरीही चालत. जीवन विद्या समजली तर मग मात्र सगळ शिक्षण उपयोगी ठरत शिक्षण कारणी लागतं.अन्यथा आपण कितीही शिकलो आणि जीवन विद्या समजली नाही तर मात्र सगळं शिक्षण व्यर्थ आहे अथवा निरर्थक ठरत. शिक्षण उच्चशिक्षण या पुढे जीवन शिक्षण असतं. ज्याला आपण जीवन विद्या संबोधतो जीवन विद्या अर्जित करण्यासाठी आपण शिक्षित असलच पाहिजे असं नाही. जीवन शिक्षण समजणं हेच जीवनातील हितार्थ आहे. लाखो करोडो रुपये खात्यावर जमा त्याच बरोबर जगातील सगळ्या सुख सुविधा उपलब्ध असणारी माणसं देखिल क्षणात जगाचा निरोप घेतात हे निश्चित भयानक आहे.पण असं का घडतंय ते महत्वाचं आहे. आपण नेमकं काय शिकतोय अथवा काय शिकलो आहेत याचा विचार आपण कधीच करत नाही. शिक्षण कुठेही घ्या फार काही फरक पडत नाही. पण जीवनदायी विद्या समजली पाहिजे आणि हि विद्या समजली नाही तर मग मात्र सगळ्या घडामोडी प्रयत्न निष्फळ निरर्थक आहेत. जीवनात काय मिळवलं किती मिळवलं या पेक्षाही समाधान कारक रित्या जीवन पुर्ण कसं करता येईल



या साठी महत्वाची विद्या जीवन विद्या समजली का ? अथवा अर्जित करता आली का? हेच अंतिमतः महत्वपूर्ण आहे.अन्यथा करोड रूपया सह सर्व सुख सुविधा असणारी व्यक्ती स्वतःला क्षणात संपवुन कशी घेईल.मग असं का ?होत का ?घडत अथवा सगळं काही ऐश्वर्या असणारी माणसं क्षणात नैराश्याच्या गर्तेत कशी सापडतात.अथवा तणाव कमी व्हावा म्हणून वेगवेगळ्या प्रकारच्या नशेच्या धुंदीत झिंगाट होतात अथवा स्वतःला नशेच गुलाम बनवतात.आपण भौतिक सुख सुविधा ज्या ज्या बाबीना संबोधतो त्या सर्व बाबी असताना देखिल जीवन अशांत अस्थिर असेल तर मग नेमकं कमी काय आहे याच मुल्यमापन केलं तर जीवन विद्या कमी पडली एवढं त्याच मर्म आहे.नैसर्गिक रित्या या जगाचा निरोप स्वीकारणं अगदी क्रमप्राप्त आहे.त्या मध्ये कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही प्रकारची सवलत कोणालाही मिळत नाही त्याची अपेक्षा करण पण गैर आहे पण स्वतःहून या जगाचा निरोप घेण्याच्या दिशेने मार्गक्रमण करण म्हणजे हे शिक्षण मग नेमकं कोणतं आहे आणि ते हितार्थ आहे का ? तर निश्चितच ते हितार्थ नाही.जीवन उदेश समजला पाहिजे.आपण उगाच काही काम नाही म्हणून जन्म घेतला नाही त्याच प्रयोजन काय आहे हे खुप महत्वाच आहे.जीवनाचं प्रयोजन समजल कि मग जीवन विद्या आपोआप समजते आणि जीवन विद्या समजली कि आपली दृष्टी आणि दृष्टीकोन आपोआप बदलतो.आणि जीवनाविषयी सकारात्मक ऊर्जे निर्माण होऊन वैचारिक प्रगल्भता प्रचंड मोठ्या प्रमाणात वृद्धिंगत होते जेणेकरून आपल्या जीवनात कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होत नाही अथवा तणावाचा प्रवेश होत नाही.जीवन विद्या हेच जीवनातील खर आणि शाश्वत वैभव आहे हे वैभव आपल्याला अर्जित करता आलं पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# ४२ वर्षांपासूनच्या संघर्षाची ८५व्या वर्षी फलनिष्पत्ती

## सलाम चिवट जिद्दीला; अन् सकारात्मक प्रशासकीय वृत्तीला!

आधुनिक केसरी

ती लढत होती एकाकीपणे, देत होती लालफितशाहीशी झुंज. कुठेही आक्रास्तेपणा नव्हता, उपोषणाचा इशारा नव्हता अन् आत्मदहनाची धमकीही नव्हती. ती येत होती, लांबचा पल्ला पार करुन.. येणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्यापुढे ती तिचं न्याय गाऱ्हाणं मांडत होती, अगदी शांतपणे. विशेष म्हणजे जेंव्हा ती यायची, तेंव्हा त्याच्या दैनंदिन नोंदी ठेवायची. काळे केस पांढरे होवून पार पिकले या संघर्षात, नवरा गेला पाठोपाठ मुलगाही गेला.. पण न्यायासाठीचा तिचा चिवटपणा गेला नाही, अखेर एका प्रशासकीय जाणीवेला तिचा संघर्ष जाणवला अन् जे काम ४२ वर्षापासून केवळ एका नोंदीमुळे रखडत पडले होते.. ते झटदिशी झाले. त्या माऊलीला विश्वचषक जिंकण्याइतका आनंद त्यादिवशी झाला, अन् ४०० चौरस फुट जागेला माध्यमांमध्येच काय.. ज्यांना ज्यांना जागेसाठीचे हे महाभारत कळाले, त्यांच्याही मनात जागा मिळाली.



'कौन कहता है आसमाँ में सुराग नही होता, एक पथ्थर तो तबीयत सें उछालो यारों..' या शायरीचा प्रवास ज्या घटनेत दिसला ती घटना सोन्याचा पाळणा असणाऱ्या जालना शहरातील. त्या चिवट जिद्दीचे नाव सुधाबाई फडके, अन् त्या जिद्दीला पाहून प्रशासकीय जाणीवेतून हा तिढा तडका-फडकी सोडविणारे निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ!

**तर काय आहे प्रकरण..?**

सुधाबाई विष्णुपंत फडके अर्थात फडकेबाई, १८ व्या वर्षी त्या रेल्वेच्या शाळेत शिक्षिका म्हणून रुजू झाल्या जालना शहरात. आपले स्वतःचे घर असावे, हे त्याचे मध्यमवर्गीय स्वप्न. म्हणून त्यांनी ९ सप्टेंबर १९७५ मध्ये स्टेशन रोडवर ३७१.७४ चौरस मिटरचा एक फ्लॉट विकत घेतला. त्यांचे पती बांधकाम विभागात कार्यरत होते तर त्यांना दोन मुली व एक मुलगा. पुढे १९८३ मध्ये त्यांनी या प्लॉटवर बांधकाम करण्याचा निर्णय घेतला, जेव्हा बांधकाम सुरु केले तेव्हा नगर भुमानच्या नोंदीत त्यांचे क्षेत्र केवळ ३३१ चौरस मिटर असल्याची नोंद आढळून आली. जवळपास ४०० चौरस फूट जागा कमी. त्यांनी तातडीने नगर भुमापन, भुमी अभिलेख विभागात अर्ज देऊन पाठपुरावा सुरु केला. मात्र कोणत्या ना कोणत्या कारणाने त्यांच्या अर्जावर प्रशासनाने निर्णय घेण्यास दप्तर दिरंगाई केली. काही दिवसांनी फडकेबाई परभणीत स्थायिक झाल्या, पती विष्णुपंत व नंतर मुलाचेही निधन झाले. आता दोन लेकींचा सांभाळ, त्यांचे शिक्षण अन् नोकरी करीत त्यांनी आपला प्रशासनासोबतचा लढा चालू ठेवला. पुढे दोन्ही मुली उच्चशिक्षण घेऊन प्राध्यापक झाल्या, ४००चौरस फूट जागा कमी तर कमी, आहे तो फ्लॉट विकून टाकू.. असे म्हणत जावई व लेकींनी आता हा पाठपुरावा नको म्हणून त्यांना गळ घातली. परंतू सुधाबाईंनी आपला पाठपुरावा सोडला नाही. विशेष म्हणजे महसूलच्या कायद्यांची फारशी माहिती नसल्याने त्यांनी क्षेत्र दुरुस्ती आणि अपीलीय अधिकार, यासंदर्भातील पुस्तके विकत घेऊन हे कायदे माहित करुन घेतले.

मुळात हा प्रशासकीय घोळ झाला होता तो अंकगणितीय चुकीमुळे. खरेदी केला ३७१.७४ चौरस मिटर, भुमापन विभागात झाली होती केवळ ३३१ चौ. मी. ची नोंद. घराचे बांधकाम सुरू करावयाचे असल्यामुळे ही चूक त्यांच्या लक्षात आली, अन् मग सुरू झाला एक संघर्ष..१९८२ मध्ये बांधकाम सुरु करताना हा प्रकार समजला, व त्यांनी आपल्या मालमत्ता पत्रात क्षेत्र दुरुस्तीसाठी पाठपुरावा सुरु केला. वयाच्या ४३ वर्षी सुरु केलेल्या त्यांच्या या पाठपुराव्याला ८५ व्या वर्षी यश आले, ते असे.. लोकसभा निवडणूकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या धामधुमीत एप्रिल २०२४ मध्ये नेहमीप्रमाणे सुधाबाई फडके जिल्हाधिकारी कार्यालयात आल्या. तिथे निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ यांची त्यांनी भेट घेतली. वायाळ यांनी अर्धा तास वेळ देत त्यांच्यासोबत बसुन सर्व फाईल चाळली. आता आमच्या मागे खुप धावपळ आहे, तुम्ही लोकसभा निवडणूक संपल्यावर या.. असा निरोप देत आरडीसी वायाळ यांनी त्यांची समजूत काढली. ४२ वर्षे थांबलो अजून दोन महिने थांबू, असा विचार फडकेबाईंनी करून आचारसंहिता संपल्यावरनंतर मे महिन्यात त्या पुन्हा वायाळ यांच्याकडे आल्या.

मग सुरू झाला चुकीचा शोध, सोहम वायाळ यांनी तासभर त्यांनी केलेल्या पाठपुराव्याची माहिती घेतली. त्यातून भुमी अभिलेख विभाग, नगर भुमापन विभाग या सर्व अधिकाऱ्यांकडून सुधाबाईंची फाईल मागवली. मूळ फाईल गहाळ झाली होती, त्यांच्याकडे असलेल्या झेरॉक्स कागदांवरुन नवी संचिका तयार करण्यात आली.

सर्व कागदपत्रांचा बारकाईने अभ्यास करून नंतर हे प्रकरण जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे ते घेऊन गेले. त्यांनी क्षेत्र दुरुस्तीचे आदेश देत नगर भुमापनमध्ये त्याची नोंद करण्याचे निर्देश दिले. विशेष म्हणजे त्यादरम्यान भुमी अभिलेखमधील गहाळ झालेली फाईलही सापडली.

अशाप्रकारे सुधाबाई फडके यांच्या सततच्या या पाठपुराव्याला ४२ वर्षानंतर यश आले, अभिलेखात तशी दुरुस्ती करण्याचे आदेश २६ जून २०२४ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

सुधाबाई फडके यांनी ४२ वर्षात सरकारी कार्यालयात हजारो चकरा मारुन उंबरठे झिजवले, हे करीत असताना त्यांनी प्रत्येक भेटीची नोंद ठेवली. कोणत्या दिवशी कोणत्या अधिकाऱ्याची भेट घेतली ? याचा सर्व लेखाजोखा त्यांनी लिहून ठेवला. विशेष म्हणजे त्यांच्या प्लॉटचे क्षेत्र नगर भुमापन मध्ये कमी दिसत असल्याने त्यांच्या शेजारी असलेल्या प्लॉटधारकारने दुय्यम मालमत्ता पत्रक तयार करुन सुधाबाईंचे उर्वरित क्षेत्र हडपण्याचा प्रयत्नही केला होता. परंतू, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ आणि निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ यांनी ते दुय्यम मालमत्ता पत्रक रद्द करुन सुधाबाईंना त्यांच्या हक्काचे सुधारीत मालमत्ता पत्रक दिले.

सोहम वायाळ हा अधिकारी मुलाप्रमाणे मदतीला आला व त्याने सर्व कामे बाजुला ठेऊन माझ्या अर्जावर निवाडा दिला, अशा भावना सुधाबाई फडके यांनी व्यक्त करून, असाच अधिकारी ४२ वर्षापूर्वी भेटला असता तर माझ्या घराचे स्वप्न साकार झाले असते.. अशी प्रतिक्रिया आता ८५ व्या वर्षी मी कशाला घर बांधणार? परंतु न्याय मिळण्यासाठी जो मोठा संघर्ष केला आणि त्याला यश आले यात समाधान असल्याचे त्या म्हणाल्या.

या ८५ वर्षीय आजीकडून शिकण्यासारख्या ज्या काही गोष्टी सोहम वायाळ यांनी नमूद केल्या त्यात त्या आजी लहानपणापासून चहा पीत नाही, फक्त दूध घेतात. आजी परभणीवरून एकट्या रेल्वेने जालन्याला येत-जात होत्या. आजीने पुस्तक विकत घेऊन अभ्यास करून लढाई लढली. आजीने ही लढाई लढताना सर्व कागदपत्रे फाईल अपडेट ठेवली होती. आजीने त्या-त्या दिवश्री काय काम केले, कोणाला भेटल्या.. याबाबत त्यांनी घरी एक चार्ट बनवला असल्याचे वायाळ यांच्या निदर्शनास आले. अशाप्रकारे ४२ वर्षापासूनच्या फडके बाईंच्या संघर्षाचा ८५व्या वर्षी यश मिळाले. खरोखर सलाम त्या चिवट जिद्दीला अन् निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ यांच्या सकारात्मक प्रशासकीय वृत्तीला!

राजेंद्र काळे




# आषाढी वारी माझ्यासाठी मोठी पर्वणी, १९८० पासूनचा मी वारकरी

## माजी आमदार रोहिदास चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** वारी हाच श्वास, वारी हाच ध्यास, "उभा विटेवरी पांडुरंग" पांडुरंगाच्या चरणी नतमस्तक होत, टाळ मृदंगाच्या निनादात, कपाळी बुक्का लावून, खांद्यावरी भगवा ध्वज घेऊन मुखी पांडुरंगाचे नामस्मरण करत दि.(०८) जुलै रोजी लोणंद मुक्कामी दिंडी पंढरीच्या दिशेने मजल दरमजल करत निघाली असून १९८० पासूनची वारी न थकता न शिनता विठ्ठलाची ओढ अजूनही चालू आहे. आषाढी वारी ही माझी पर्वणी असल्याचे माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी सांगितले. मी लोकप्रतिनिधी जरी असलो नसलो तरी साधु महाराज कंधारकर दिंडी पासून माझी वारी सुरू झाली. सुविद्य पत्नी आशाताई चव्हाण समवेत आळंदी ते पंढरपूर दिंडीत रंगनाथ महाराज परभणीकर तर कधी कंदरकर महाराज यांच्या दिंडीत सहभागी होत असल्याचे ही माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की माणसाला किंमत नसून त्यांच्या गुणाला किंमत असते. माणसाचे जीवन एक क्षणभंगुर आहे मी वारकरी लोकप्रतिनिधी असलो तरी वारीच्या काळात कधी कुण्या रेस्ट हाऊस वर लॉजवर थांबत नाही. वारकऱ्यांच्या पंक्तीततच जे असेल तोच नाष्टा करतो भोजन करतो, परमेश्वराच्या संतांच्या सहवासात राहिल्यामुळे माणूस व त्याचे कुटुंब सुसंस्कातीत व्हायला वेळ लागत नाही. माझे वडील खोबराजी पाटील चव्हाण व आई भोजाबाई यांचे मला सात्विक संस्कार मिळाले. त्यांच्या शिकवणीमुळेच मी सपत्नीक माऊलीच्या सोहळ्यात वारी न चुकता पंढरीची करत असल्याचे वारकरी रोहिदास चव्हाण म्हणाले.

यावेळी सोबत लोहा शहर परिसरात भक्त यात बाबाराव हालगे,मुक्ताबाई हालगे, दशरथ लिंबोटकर, दिगंबर शिंदे सह असंख्य विठ्ठल भक्त उपस्थित होते.

> आनंदी व सुकर जीवन जगण्यासाठी आषाढी वारी माझ्यासाठी पर्वणी आहे. रोजच्या अन्नापासून दूर राहता येते. स्वत:वर अंकुश ठेवता येतो. मुखी हरिनामाच्या जागरामुळे मनावर बंधन घालता येतात. मानसिक एकाग्रता वाढून प्रचंड आत्मविश्वास वाढतो. वारीत भेदभाव नसतो. गरीब श्रीमंत स्त्री पुरुष एकतत्वाने वारीत मानतात.सर्वजणच पंढरीच्या चरणी लीन होत असतात.
>
> – रोहिदास चव्हाण माजी आमदार लोहा कंधार

# खामगावनजीक पुरात चारचाकी गेली वाहून

आधुनिक केसरी न्यूज



**बुलढाणा :** जिल्ह्यात सर्वदूर पावसाने हजेरी लावली. दोन तालुक्यांसह तब्बल १६ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली असून यामुळे अनेक मार्गांवरील वाहतूक बंद झाली आहे. खामगावनजीक पुरात चारचाकी (कार) वाहून गेली. सुदैवाने वाहनात कोणीच नसल्याने संभाव्य अनर्थ टळला. अपुऱ्या आणि अनियमित पावसाची नोंद झालेल्या बुलढाणा जिल्ह्यातील लाखो शेतकरी आणि राहिवासीयांची आर्त हाक वरुण राजाने अखेर ऐकली! काल रविवारी रात्री दहा वाजेनंतर सुरू झालेला पाऊस रात्रभर कमी अधिक प्रमाणात कोसळत राहिला. खामगाव आणि मोताळा तालुक्यात जास्त जोर असल्याने या दोन्ही तालुक्यांत अतिवृष्टीची नोंद झाली. खामगाव तालुक्यात तब्बल ९२.८ तर मोताळा तालुक्यात ९०.४ मिलीमीटर इतक्या कोसळधार पावसाने तालुक्यातील अनेक गावांना झोडपले. खामगाव तालुक्यातील पिंप्री गवळी, पेडका पातोंडा, आवार, नागापूर या गावात कोसळधार पावसाने काल रात्रभर हजेरी लावली. खामगाव नांदुरा मार्गावरील सुटाळा गावानजीक नदीला आलेल्या पुरात एक वाहून गेली. सुदैवाने या कारमध्ये कुणीच नसल्याने संभाव्य अनर्थ टळला! ही कार नदीच्या काठावर उभी करण्यात आली होती, असे गावकऱ्यांनी सांगितले. याचबरोबर काठावर असलेली पान टपरीसुद्धा वाहून गेली. दरम्यान खामगाव तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसाने खामगाव ते नांदुरा, खामगाव ते बुलढाणा आणि खामगाव ते जालना या राज्य मार्गावरील वाहतूक किमान तीन तास बंद होती. खामगाव ते अकोला मार्गावरील कोलोरीनजीक आज सोमवारी सकाळी पुराचे पाणी पुलावरून वाहत होते. मुसळधार पावसाने अनेक ठिकाणी नदी नाले एक झाले. जळगाव, मोताळा तालुक्यातही वाहतुकीवर परिणाम झाला. इतर तालुक्यांतही वाहतूक प्रभावित झाल्याने नोकरदार, शालेय महाविद्यालयीन विध्यार्थ्यांची गैरसोय झाली. दरम्यान या तुलनेत इतर तालुक्यांतील पावसाची तीव्रता कमी होती. नांदुरा ४४ मिलीमीटर, मेहकर ३४ मिमी, शेगाव ३४ मिमी, चिखली ३१, मलकापूर २८, जळगाव जामोद २६ मिमी, संग्रामपूर २३ मिमी, बुलढाणा तालुक्यात २३ मिलीमीटर पावसाने हजेरी लावली.

# पोलिसांच्या हलगर्जीमुळे आरोपी फरार!

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** हैदराबाद येथून बाल लैंगिक अत्याचारातील पकडून आणलेल्या आरोपीने सोमवारी उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करीत असताना पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पसार झाला. ही घटना ८ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता घडली. मुखेड येथील परमेश्वर मष्णाजी टाळीकोटे याने एका अल्पवयीन मुलीला फूस लावून पळविल्याप्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणी पोलिसांनी तपास केला असता आरोपी हा हैदराबाद येथे असल्याची माहिती मिळाली. पोलिस ७ जुलै रोजी हैदराबाद येथे गेले होते. पोलिसांनी आरोपी टाळीकोटे व मुलीस ८ जुलै रोजी पहाटे २ वाजता पकडून आणले होते. आरोपीला सोमवारी सायंकाळी ६ वाजता वैद्यकीय उपजिल्हा रुग्णालयात तपासणीसाठी पोलिस उपनिरीक्षक मंचक फड व एक पोलिस शिपाई यांनी आणले. या ठिकाणी वैद्यकीय तपासणी करते वेळेस त्याची हाथकडी काढली. मात्र वैद्यकीय तपासणी होताच आरोपीने झटका मारून उपजिल्हा रुग्णालयातील खोली क्रमांक १६ मधून धूम ठोकली. त्याच्या अटकेसाठी पोलिस प्रयत्न करीत असल्याचे पोलिस निरीक्षक लक्ष्मणराव केंद्रे यांनी सांगितले.



# डोणगाव सरपंचाच्या विरोधात अविश्वास ठराव मंजूर

## सरपंचपद कोणाचे चरण स्पर्श करणार याची सर्वत्र चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**जैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत व मेहकर तालुक्याची आर्थिक बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध असलेली ग्रामपंचायत ही डोणगावची आहे. नेहमीच चर्चेत असणारी ग्रामपंचायत म्हणून जिल्ह्यात प्रसिद्ध असणारी ग्रामपंचायत डोणगावच्या सरपंच रेखा रवी पांडव यांच्याविरुद्ध अविश्वास ठराव १३ विरुद्ध ४ मतांनी मंजूर झाला आहे. रेखा पांडव यांच्या विरोधात ३ जुलै रोजी ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात न घेता परस्पर निर्णय घेणे, मनमानी पद्धतीने कारभार करणे या कारणांवरून मेहकर तालुक्याचे तहसीलदार निलेश मडके यांच्याकडे अविश्वास ठरावासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता. या अर्जावर निर्णय घेण्यासाठी दिनांक ८जुलै रोजी तहसीलदार निलेश मडके यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा घेण्यात आली होती. यासाठी डोणगाव ग्रामपंचायतचे सर्व १७ सदस्य उपस्थित होते.

डोणगाव ग्रामपंचायतच्या १७ सदस्यांपैकी १३ सदस्यांनी विद्यमान सरपंच रेखा पांडव यांच्या विरोधात अविश्वास ठरावाची मागणी मेहकर तहसीलदार निलेश मडके यांच्याकडे केली होती. त्यानुसार तहसिलदार मडके यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत कार्यालयात सोमवार दि . 8 जुलै रोजी विशेष सभा घेण्यात आली. यावेळी म एकूण १७ सदस्य उपस्थित होते. यापैकी १३ सदस्यांनी ठरावाच्या बाजूने, तर सरपंच रेखा पांडव व इतर ३ सदस्यांनी यांनी ठरावाच्या विरोध केला. यावेळी भगवान वामनराव बाजड, शिवचरण विजय आखाडे, श्याम प्रल्हाद इंगळे,संजु निवृत्ती जमदाडे,सलमाबी सैय्यद नूर अत्तार, जोईप खाँ बिस्मिला खाँ, नंदा मुरलीधर लांभाडे, शेख मदन शेख दाऊत, फरजाना बी सत्तार शाह, पूजा सचिन साखळकर,जयश्री भूषण आखाडे, संदीप नागोराव टाले, सिंधू राजू खोडके, निर्मला प्रकाश बाजड, मीना रमेश काळे, शे कय्युम शे उस्मान आदी ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. सरपंच रेखा पांडव यांच्या विरोधात अविश्वास ठराव मंजूर झाल्याने आता पुढील सरपंच कोण होणार ? सरपंच पद कोणाचे चरण स्पर्श करणार याबाबत विविध तर्क लढवले जात आहेत.




# ऑगस्ट महिन्यात मिसेस फूड राईट प्रीमियर लीग; गेट गोईंगतर्फे महिलांसाठी आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महिलांच्या सक्षमिकरणासाठी काम करणाऱ्या गेट गोईंग संस्थेने फक्त महिलांसाठी मिसेस फूड राईट क्रिकेट लीग २०२४ चे आयोजन ४ ऑगस्ट रोजी केले असून स्पर्धेत भाग घेण्यासाठी नाव नोंदणी सुरु करण्यात आली आहे अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

छ. संभाजीनगर मध्ये महिलांसाठी क्रिकेट लीग गेट गोईंगने सर्वात प्रथम सुरु केली. यावर्षी स्पर्धेचे हे सातवे वर्ष आहे.

गेट गोइंग संस्थेने यावर्षी 14 वर्ष पूर्ण केली आहेत. औरंगाबाद मध्ये मॅरेथॉनचा पाया खऱ्या अर्थाने गेट गोईंगनेच घातला. महिलांच्या आरोग्य सक्षमीकरणासाठी संस्थेने मानसिक ताण तणाव व्यवस्थापना पासून ते घरकाम करणाऱ्या महिलांचे आरोग्य तपासणी असे अनेक उपक्रम राबवले . खेळ आरोग्य रक्षणात महत्वाचे ठरतात त्याचबरोबर महिलांना दररोजच्या धकाधकीच्या आयुष्यातून उसंत आणि आनंद देतात. याचाच विचार करुन गेट गोईंगने मिसेस फूड राईट क्रिकेट लीग मागील सात वर्षांपासून घेणे सुरु केले असे डॉ . संतोष तोतला यांनी सांगितले.

बहुतांश महिला स्वतःच्या आरोग्यास प्राधान्य देत नाहीत. स्त्री नोकरी करणारी असो वा नसो स्वतःसाठी वेळ काढणे, स्वतःचे छंद जोपासणे किंवा किमान स्वतःच्या आरोग्याच्या तक्रारींची वेळीच दखल घेऊन त्यावर उपाययोजना करणे याला कधीच महत्व देताना दिसत नाही. महिलांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य प्राधान्यक्रमावर यावे, याबाबत महिलांमध्येही जागृती व्हावी यासाठी गेट गोईंग ही संस्था मागील चौदा वर्षांपासून काम करत आहे. महिलांनी घरातून बाहेर निघून स्वतःसाठी जगावे, खेळाच्या माध्यमातून त्यांनी आपले आरोग्य जोपासावे हाही या स्पर्धेचा उद्देश आहे असे डॉ . प्रिया देशमुख म्हणाल्या. महिलांसाठी भरवण्यात येणारी ही शहरातील सर्वात मोठी क्रिकेट लीग आहे. एकूण झालेल्या नोंदणी मधून

**वारी फॉर हर :** गेटगोईंग यावर्षी आषाढी एकादशीच्या निमित्ताने वारी फॉर हर हा उपक्रम राबवत आहे . 17 जुलै रोजी बाबा पेट्रोल पंप ते छोटे पंढरपूरपर्यंत महिलांची वारी सकाळी पाच वाजता निघणार आहे . यासाठी नोंदणी सुरु आहे . जास्तीत जास्त महिलांनी यात सहभागी व्हावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे .



प्रत्येक संघात आठ खेळाडू असतील त्यातील सात खेळाडू अठरा वर्षा वरील महिला आणि एक बारा वर्षाखालील मुलगा किंवा चौदा वर्षां खालील मुलगी असेल.

नोंदणी केलेल्या नावांमधून संघ तयार करण्यात येतील. विजेत्या संघास भरघोस बक्षिसे आणि प्रत्येक सहभागी खेळाडूस मेडल देण्यात येणार आहे. महिलांसाठी छ. संभाजीनगरात होणारी ही अतिशय महत्वाची आणि लोकप्रिय क्रिकेट लीग आहे. आतापर्यंत दहा संघानी नोंदणी केली आहे. जास्तीत जास्त महिलांनी स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन डॉ. प्रिया देशमुख यांनी केले आहे.

स्पर्धेसाठी नोंदणी प्रक्रिया सुरु झाली आहे. नोंदणीसाठी गेट गोईंगच्या वेबसाईट वर जाऊन अथवा HTTPS://GETGOINGABD.COM/EVENT या लिंक वर जाऊन नोंदणी दि.१५ जुलै पर्यंत करावयाची आहे अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. पत्रकार परिषदेला डॉ. प्रिया देशमुख, डॉ. संतोष तोतला, डॉ . उमा महाजन, दीपाली डाबरी , डॉ . वंदना मिश्रा, डॉ. चारू देशमुख, डॉ. सुजाता लाहोटी, नीना निकाळजे, डॉ. नीती सोनी, निरुपमा नागोरी, डॉ.भावना लोहिया, आरती अग्रवाल, अर्चना शिंदे, उमा भोसले, यांची उपस्थिती होती.

# १७०९ परीक्षार्थींनी दिली परीक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** जिल्हा पोलिस दलातील १६४ पोलिस कर्मचाऱ्यांची भरती करायची आहे, त्यासाठी रविवारी शहरातील आदित्य महाविद्यालयात लेखी परिक्षा घेण्यात आली. या महाविद्यालयातील चाळीस हॉल आरक्षित करण्यात आले होते, प्रत्येक हॉलमध्ये दोन सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. परिक्षेदरम्यान कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दरम्यान १७२४ पैकी १७०९ उमेदवारांनी पोलिस भरतीची ही लेखी परिक्षा दिली, त्यानुसार उत्तर पत्रिका लावण्यात आली असून आज दि. ८ जुलैच्या रात्रीपर्यंत या परिक्षेचा निकालही घोषीत केला जाणार आहे. मागच्या काही दिवसांपासून पोलिस मुख्यालयाच्या प्रांगणात पोलिस भरतीची प्रक्रिया सुरू होती, जे परिक्षार्थी फिजीकलसाठी पात्र ठरले होते त्या परीक्षार्थ्यांची रविवारी आदित्य महाविद्यालयामध्ये लेखी परिक्षा घेण्यात आली. एक हजार ७२४ परिक्षार्थी परिक्षेसाठी बसले होते. यापैकी १७०९ परिक्षार्थीनी ही लेखी परिक्षा दिली. आदित्य महाविद्यालयातील चाळीस हॉल परिक्षेसाठी आरक्षित करण्यात आले होते. प्रत्येक हॉलमध्ये दोन सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले होते. यावेळी स्वतः आयजी विरेंद्र मिश्रा, पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, डीवायएसपी विश्वांभर गोल्डे यांच्यासह इतर पोलिस अधीकारी परिक्षा केंद्रावर तळ ठोकून होते, दरम्यान परिक्षा संपल्यानंतर या लेखी परिक्षेची उत्तरपत्रिका लावण्यात आली आहे. तर आज दि. ८ जुलै रोजी रात्री पर्यंत निकाल घोषित केला जाणार आहे.

# परीक्षा बंदोबस्तासाठी जात असलेल्या पोलीस उपनिरीक्षकाचा अपघाती मृत्यू

## नेकनूर परिसरातील घटना, कार चालक फरार

आधुनिक केसरी न्यूज

**नेकनूर :** परीक्षा बंदोबस्तासाठी दुचाकीवर जात असलेल्या पोलीस उपनिरीक्षकाच्या दुचाकीस समोरुन विरुद्ध दिशेने भरधाव आलेल्या कारने जोराची धडक दिली. या अपघातात पोलीस उपनिरीक्षकाचा मृत्यू झाला असून एक उपनिरीक्षक गंभीर जखमी झाला आहे. त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. हा अपघात नेकनूर परिसरात रविवारी (दि.७) सकाळी सातच्या सुमारास घडली. दरम्यान कार चालक फरार झाला असून याप्रकरणी रात्री उशीरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती. मच्छिंद्र श्रीधर नन्नवरे असे अपघातात मयत झालेल्या पोलीस उपनिरीक्षकाचे नाव आहे. ते दिंदूड पोलीस ठाण्यात कार्यरत होते. रविवारी सकाळी पोलीस भरतीच्या बंदोबस्तासाठी सिरसाळा पोलीस ठाण्यातील उपनिरीक्षक रमेश धोंडिराम नागरगोजे यांच्या सोबत दुचाकीवरुन (एम.एच २३ ए.के.९३९७) जात होते. नेकनूर परिसरात त्यांच्या दुचाकीला समोरुन विरुद्ध दिशेने भरधाव आलेल्या स्विफ्ट कारने (एम. एच.२३ बी.सी. २१०८) जारोची धडक दिली. या अपघातात नन्नवरे यांचा जागीच मृत्यू झाला. तर नागरगोजे हे गंभीर जखमी झाले, घटनेनंतर कार चालकाने पळ काढला.

# रायगडावर जाणारे मार्ग बंद करण्याचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज



**रायगड :** रायगड किल्ल्यावर काल ढगफूटी सदृश्य पर्जन्यवृष्टी झाल्याने महाद्वारातील पायऱ्यावरुन दुथडी भरुन धबधबा वाहू लागला आहे. त्यामुळे सावधानता म्हणून रायगडावर जाणारे सर्व मार्ग बंद करण्याचा निर्णय रायगड जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. रायगडावरील 'रोप-वे सेवा' देखील बंद केलेली आहे. या रायगडाच्या दगडी पायऱ्यांवरुन अचानक पाण्याचे मोठे धबधबे वाहू लागल्याने पर्यटकांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याने हा निर्णय घेतला गेला आहे. लोणावळा येथील भूशी डॅमजवळील धबधब्यात अचानक पाणी वाढल्याने एकाच कुटुंबातील पाच सदस्य वाहून गेल्याची घटना नुकतीच घडली आहे. त्यानंतर सरकारने सर्वच धबधबे, नदी आणि धरणाच्या परिसरात सीआरपीसीचे कलम 144 जमावबंदी लागू केली आहे. तरीही पर्यटक अशा ठिकाणांवर बंदी मोडून मौजमस्ती करण्यासाठी जातच आहेत.

# ध्येयप्राप्तीसाठी कठोर परिश्रमाचा निर्धार करा

## सुधीर मुनगंटीवार यांचे गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन : मुल येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** विद्यार्थी देशाचे भविष्य आहेत. आजचे यश हे उद्याच्या उज्ज्वल भवितव्याकडे वाटचाल करणारे महत्वाचे पाऊल आहे. मुल तालुक्यातील विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिभेच्या जोरावर आकाशामध्ये यशाची उंच भरारी घेण्याची कामगिरी केली आहे. मुल तालुक्याचा गौरव महाराष्ट्रभर, देशामध्ये सुगंध पोहोचेल, असे कार्य करा, अशा शुभेच्छा देताना राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी विद्यार्थ्यांना ध्येयप्राप्तीसाठी परिश्रमाचा निर्धार करा, असा संदेश दिला. मुल येथे आयोजित करिअर व व्यक्तिमत्व विकास मार्गदर्शन तथा गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाला सोपान कनेरकर, भारतीय जनता पार्टीचे महामंत्री डॉ. मंगेश गुलवाडे, राजेंद्र महाडोळ, माजी नगराध्यक्ष रत्नमाला भोयर, नंदकिशोर रणदिवे, प्रभाकर भोयर, चंदू मारगोनवार, अजय गोगुलवार,अनिल सावरकर, महेंद्र करकाडे, किशोर कापगते, सोहम बुटले, माजी नगराध्यक्ष उषाताई शेंडे, प्रवीण मोहुर्ले, सुखदेव चौधाले यांच्यासह पुरस्कारप्राप्त विद्यार्थी, पालक, शिक्षक आदी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

यावेळी सुधीर मुनगंटीवार यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून कौतुक केले. पुढील वाटचाल ठरवितांना आणि लक्ष्य निर्धारित करताना त्याचा निर्धार परिश्रमातून करा. परिश्रमातून केलेला निर्धार हा यशाची वाट स्पष्ट आणि सोपी करतो, असा संदेशही त्यांनी यावेळी दिला. विद्यार्थ्यांनी मोबाईल, इंटरनेटचा वापर हा अभ्यासाठी आणि आवश्यकते पुरताच करावा, असेही त्यांनी नमूद केले. आई-वडीलांना दुखवून कुठलेही यश मिळविता येत नाही. त्यामुळे आई-वडिलांचा आदर राखा. वाईट संगतीपासून दूर रहा, असाही संदेश सुधीर मुनगंटीवार यांनी दिला. मुनगंटीवार यांनी राज्य शासनाकडून सुरू करण्यात आलेल्या शैक्षणिक योजनांबद्दल माहीती दिली. मुलींना उच्च शिक्षणात जातपात, उत्पन्न आडवे येऊ नये यासाठी शासनाकडून मुलींच्या व्यावसायिक उच्च शिक्षणाची शंभर टक्के शुल्क माफी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. बल्लारपूर येथे साकारण्यात येत असलेल्या मेडिकल कॉलेजमध्ये मुलींसाठी वस्तीगृहांची संख्या अधिक असल्याचेही त्यांनी सांगितले. पुस्तकातील ज्ञानासोबतच व्यावहारीक ज्ञान देखील आवश्यक आहे. यासाठी सरकारकडून सहा महिने १० हजार रुपये सन्मान निधी योजना सुरू करण्यात आली असल्याचेही सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले. बल्लारपूर येथे मुलींसाठी एसएनडीटी विद्यापीठ सुरू झालेले आहे. पुढे या विद्यापीठात ६२ व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करणार आहेत. सर्वात जास्त अभ्यासक्रम या उपकेंद्रात राहतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. बाबूपेठ येथे गोंडवाना विद्यापीठाचे उपकेंद्रामध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मोरवा एअरपोर्टमध्ये दोन फ्लाईंग क्लब लवकरच सुरू होत आहेत. आपल्या भागातील भगिनी आणि बांधवांना सुद्धा आकाशात उंच भरारी घेता यावी, यासाठी ही सुरुवात आहे. कमर्शिअल पायलट ट्रेनिंगसाठी एकूण ५० लक्ष रुपये लागतात. मात्र प्रतिभावंत गोरगरीब विद्यार्थी केवळ पैशाअभावी या शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी ४८ लक्ष रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे आपल्या भागातील विद्यार्थ्यांचे पायलट होण्याचे स्वप्न साकार होणार आहे, अशी माहिती देखील ना.श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.





# 'वादळाशी झुंजताना' कथेचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** सामाजिक सांस्कृतिक चळवळीत सक्रीय असलेली मायबोली मराठी परिषदेच्या वतीने आयोजित नवेकर आर्य लिखित 'वादळाशी झुंजताना' या अनुभव कथेचा प्रकाशन सोहळा येथील चौधरी फैक्शन हॉलमध्ये नुकताच संपन्न झाला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध सर्पदंशतज्ञ मराठवाडा भूषण डॉ. दिलीप पुंडे हे होते तर विचार शलाका लातूरचे संपादक प्रा.डॉ. नागोराव कुंभार यांच्या शुभहस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून मराठवाडा साहित्य परिषद लातूरचे अध्यक्ष डॉ. जयद्रथ जाधव, कॅन्सर तज्ञ डॉ. आनंद डी. भगत, साहित्यिक विरभद्र मिरेवाड, प्रा. संभाजी पाटील, कदम, मायबोली मराठी परिषदेचे अध्यक्ष प्रकाश पवारसह नवेकर यांचे कुटूंबीय आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांचा मायबोली मराठी परिषदेच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक प्रकाश पवार यांनी तर नवेकर यांनी 'वादळाशी झुंजताना' या पुस्तकाच्या प्रकाशना मागची भूमिका मांडली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी डॉ. दिलीप पुंडे, डॉ. नागोराव कुंभार, डॉ. जयद्रथ जाधव, डॉ. आनंद डी. भगत, साहित्यिक विरभद्र मिरेवाड यांची समयोचित भाषणे झाली. यावेळी गुरुदेव शिक्षण संस्थेचे संचालक संजय गरुडकर, बालाजी गरुडकर, प्राचार्य बालाजी येवते, प्राचार्य कदम, साहित्यिक गोविंद कवळे, पंडीत पाटील, संजीव डोईबळे आदिसह त्यांचे मित्र नातेवाईक उपस्थित होते. सुत्रसंचलन एकनाथ डुमणे यांनी तर आभार ज्ञानोबा जोगदंड यांनी मानले. मायबोली परिवाराच्या सहकार्यातून हा कार्यक्रम यशस्वी पार पडला. यावेळी डॉ. रामकृष्ण बदने, संतोष तळेगावे, साधना पेंढारकर यांची उपस्थिती होती.

# मुंबईची तुंबई का झाली; नालेसफाईत मोठा भ्रष्टाचार : विजय वडेट्टीवार

## चंद्रपूर स्फोट, अमरावतीतील गोळीबार, मुंबई हिट अँड रन प्रकरणाची चौकशी करा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काल झालेल्या मुसळधार पावसामुळे मुंबईची तुंबई झाली. नालेसफाई न केल्याने पाणी रेल्वे स्टेशन आणि रस्त्यावर साचले. नागरिकांचे प्रचंड हाल झाले. निवडणुका न झाल्याने आता मुंबईत लोकप्रतिनिधी नाहीत. त्याचा फटका बसला आहे.याचा अर्थ नालेसफाईसाठी खर्च केलेले शेकडो कोटी रूपये पाण्यात गेले आहे. याप्रकरणाची शासनाने उच्चस्तरीय चौकशी केली पाहिजे, अशी मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी स्थगनचा माध्यमातून विधानसभेत केली आहे. चंद्रपूर बल्लारशाह शहरात दिवसा ढवळ्या पेट्रोल बॉम्ब टाकण्यात आला. कट्ट्याचा वापर करून गोळीबार केला गेला. यामध्ये दुकान जळाले, व्यक्तीच्या पायाला गोळी लागली. तडीपार गुंडाने हा हल्ला केला. आठ दिवसापासून ही व्यक्ती शहरात फिरत असल्याची माहिती पोलीसांना होती. तरी देखील कारवाई झाली नाही. त्यामुळे संबंधित पोलीस निरीक्षकाला निलंबित करण्यात यावे, अशी मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते वडेट्टीवार यांनी केली. अमरावतीत देखील गोळीबार झाला झाला. मुंबईत हिट अँड रनच्या घटना सतत घडत आहेत. मिहिर शहा नावाच्या व्यक्तीने भरधाव गाडीखाली एका महिलेला चिरडले. संबंधित व्यक्ती राजकीय पक्षाशी संबंधित आहे. यामध्ये राजकीय हस्तक्षेप होत आहे. त्यामुळे या प्रकरणांची देखील चौकशी झाली पाहिजे,अशी मागणी वडेट्टीवार यांनी विधानसभेत केली.



# चिकनगुनियाने काढले डोके वर

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** उपराजधानीत चिकनगुनियाने डोके वर काढले आहे. मागील ३५ दिवसांमध्ये या आजाराचे तब्बल ३७ रुग्ण आढळल्याने आरोग्य विभागाचे धाबे दणाणले आहेत. अनियमित पावसामुळे शहरातील वातावरण दमट झाले आहे. असे वातावरण डासांची घनता वाढवण्यासाठी पोषक असते. त्यातूनच शहरात 'एडीस' जातीचे डास वाढून चिकनगुनिया वाढत आहे. धरमपेठ, मंगळवारी झोनमध्ये चिकनगुनियाचे सर्वाधिक रुग्ण नोंदवले गेले. या दोन्ही झोनमध्ये मागील ३५ दिवसांत (१ जून ते ५ जुलै २०२४) तब्बल ३७ रुग्णांची नोंद झाली. कीटकनाशक फवारणी, जनजागृतीसह इतरही प्रतिबंधात्मक उपाय हाती घेण्यात आले आहेत. त्यामुळे आता या आजारावर नियंत्रण असल्याचा महापालिकेच्या आरोग्य विभागाचा दावा आहे. नागपुरात जानेवारी २०२४ ते मे २०२४ दरम्यानच्या काळात चिकनगुनियाच्या एकही रुग्णाची नोंद नव्हती. परंतु जून महिन्यात ३० तर जुलै महिन्याच्या पहिल्या पाच दिवसांत ७ रुग्णांची नोंद झाली. या आकडेवारीला महापालिकेच्या आरोग्य विभागाने दुजोरा दिला.



# प्रभाकर इंगळे पाटील यांच्याकडे विधानसभा संघटक पदांची जबाबदारी

आधुनिक केसरी न्यूज

मुखेड : शिवसेना शिंदे गटाच्या मुखेड- कंधार विधानसभा संघटकपदी तांदळ चे माजी सरपंच प्रभाकर पाटील इंगळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबईत त्यांना नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले. इंगळे हे युवक काँग्रेसचे पदाधिकारी होते. त्यांनी परिसरातील ४० हून अधिक गावातील सरपंच व उपसरपंचासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात काही दिवसांपूर्वी प्रवेश केला होता. हा राजकीय प्रवेश राजकीय समीकरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला. आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सर्वपक्षाकडून संघटनात्मक बांधणी सुरु आहे. शिवसेना नेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली संपर्क प्रमुख आनंद जाधव, जिल्हा प्रमुख उमेश मुंडे यांच्या हस्ते प्रभाकर इंगळे पाटील यांची मुखेड - कंधार विधानसभा मतदार संघ संघटकपदी नियुक्ती करण्यात आली अहे. यावेळी तालुकाप्रमुख बालाजी पाटील कबनुरकर उपजिल्हाप्रमुख मारुती पाटील अमनर, विकास पाटील ताटे, गणेश पाटील केरुरकर सह अनेक जण उपस्थित होत. त्यांच्या नियुक्तीचे सर्वत्र कौतुक होत आहे.
संघटना बांधणी करणार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मतदार संघात शिवसेना पक्ष संघटन मजबूत करणे, विधानसभेला पक्षाचा भगवा फडकविणे, तळागाळातील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पक्षवाढीसाठी प्रयत्न करण्यास आपले सर्वोच्च प्राधान्य राहणार असल्याचे प्रभाकर पाटील इंगळे यांनी सांगितले. पक्ष संपर्क प्रमुख आनंद जाधव, माजी खासदार हेमंत पाटील, आ. बालाजी कल्याणकर, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली खा. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत मेळावा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.






# आरक्षणावरुन कंधार येथील मातंग समाज आक्रमक!

आधुनिक केसरी न्यूज

**धोंडीबा मुंडे**

**कंधार :** येथील मातंग समाज हा अनुसूचित जाती प्रवर्गातून आरक्षणाचा कागदोपत्री वाटेकरी आहे. परंतु एका विशिष्ट जातीलाच या आरक्षणाचा लाभ होत असल्याने, उर्वरित जातीपैकी मातंग समाजाला सामाजिक, शैक्षणिक आरक्षणाचा फायदा होत नाही. या संदर्भात दि.१ जुलै २०२४ पासून लोकस्वराज्य आंदोलनाचे लोण संस्थापक अध्यक्ष प्रा.रामचंद्र भरांडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. प्रा. भरांडे यांचे आमरण उपोषण हे गेल्या आठ दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे सुरू आहे. भरांडे यांची तब्येत सतत खालावत आहे. त्यामुळे सदरील उपोषणाला जाहीर समर्थनार्थ पाठिंबा दर्शवित वंचित घटकांना स्वतंत्र 'अ ब क ड' आरक्षण वर्गीकरणाचा निर्णय राज्य सरकारने तातडीने घ्यावा, यासाठी दिनांक ८ जुलै रोजी कंधार येथे एक दिवसी उपोषण करण्यात आले आहे. विविध मागण्या मान्य करण्यात याव्या या उपोषणादरम्यान मातंग समाजाची मागणी लहुजी साळवे आयोगाची तात्काळ आमलबजावणी करणे अन्य मागण्यासाठी कंधार तहसील कार्यालया समोर एक दिवस उपोषण करण्यात आले. उपोषणाला पाठींबा म्हणून तालुक्यातील तमाम मातंग समाजाच्या वतीने दि.८ जुलै रोज सोमवारी सकाळी ११.०० वाजता एकदिवशीय धरणे आंदोलन तहसिल कार्यालय कंधार येथे करण्यात आले. या आंदोलनास बालाजी वाघमारे, राजू भंडारे, महेंद्र कांबळे, कैलास सूर्यवंशी, अभिजीत शिरशीकर, विकास गायकवाड, पंडित देवकांबळे, भाऊसाहेब कांबळे, संभाजी वाघमारे, बालाजी कांबळे, हनमंत घोरपडे आदींचा सहभाग होता.

# अन्नदानातून मिळते विशेष समाधान : हनुमंतराव शेळके पाटील

## स्व. विनायकराव शेळके पाटील ट्रस्टकडून वारकऱ्यांची सेवा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखीच्या सोहळ्यात अनेक दानशूर व्यक्ती आणि संघटना यांच्या कडून वारकऱ्यांची सेवा करणारे कार्य केले जात असते. लोणंद ता.खंडाळा येथे श्री.संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी आल्यानंतर अनेकांकडून वारकऱ्यांची सेवा करण्यात आली. लोणंद नगरीचे माजी नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते हनुमंतराव शेळके पाटील यांच्या कडून स्व.विनायकराव शेळके पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून वारकऱ्यांना अन्नदान करण्यात आले.तसेच पाणी वाटप सुद्धा करण्यात आले. यावेळी हनुमंतराव शेळके पाटील, माजी नगराध्यक्ष व विद्यमान नगरसेवक सचिन शेळके-पाटील, समता आश्रमशाळा पाडेगावचे सचिव पवन सूर्यवंशी, विश्वस्त अमोल शेळके पाटील, ह.भ.प नारायण महाराज शिंदे, अजिंक्य जेबले, अविनाश लोखंडे, गणेश भिसे, शिवराज शेळके, मंगेश कुंडलकर, जितू अहिवळे, अशोक ठोंबरे व इतर उपस्थित होते. स्व.विनायकराव शेळके पाटील ट्रस्टकडुन नेहमीच सामाजिक कार्य केले जात असते. दरवर्षी वारकऱ्यांची सेवा अन्नदानातून केली जात असते. अन्नदान हे श्रेष्ठ दान असून वारकऱ्यांची सेवा अन्नदानातून करता आल्याने विशेष समाधान मिळत असल्याचे लोणंद नगरीचे माजी नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते व स्व.विनायकराव शेळके पाटील ट्रस्टचे प्रमुख हनुमंतराव शेळके पाटील यांनी म्हटले.



# गरीब विद्यार्थ्यांची संकटांवर मात; युवा सेनेने दिला मदतीचा हात

## हरीश माळी व सर्व युवा सेना गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी सज्ज

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांना व समाजातील वंचित असलेल्या विद्यार्थांनांचे मनोबल वाढविण्यासाठी धुळे जिल्हा युवासेनेने शालेय वस्तुंचे वाटप करून व पर्यावरणा विषयी जागृतीसाठी शाळांमध्ये वृक्षरोपणाचे कार्यक्रम राबविण्यात आला.
भाजप शासित केंद्र व राज्य सरकारच्या चुकिच्या धोरणांमुळे शिक्षणाचे भांडवलिकरण प्रचंड वेगाने होत आहे. समाजातील वंचित घटकांच्या विद्यार्थ्यांना स्पर्धे बाहेर टाकण्यासाठी सरकार कडून विषमता वादी धोरणे राबविली जात आहेत. यात प्रामुख्याने मुठभर श्रीमंताच्या मुलांना मोठ्या प्रमाणावर संसाधने उपलब्ध करून, आर्थिक व समाजिक दृष्ट्या मागसलेल्या विद्यार्थ्यांचे मात्र मनोबल खच्चकरणांसाठी शिक्षणाचे बाजारीकरण व भांडवलिकरण मोठ्याप्रमाणावर केले जात आहे. या जाचक ध्येय धोरणांच्या विरोधात जागृती करण्यासाठी धुळे जिल्हा युवासेनेने आदित्य मोहोत्सवाच्या निमित्ताने जिल्हाभर सदर मोहिम राबवित आहे. शेतकऱ्यांचे खच्चीकरण भाजप प्रणित केंद्र व राज्य शासना कडून सात्यात्याने होत आहे असा आरोप युवा सेना ने केला जिल्ह्यातील शेतकरी आर्थिक दृष्ट्या हवालदिल झाला आहे. गरजू शेतकरी कुटुंबातील व सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना धुळे जिल्हा युवासेना शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने मोफत वह्या वाटपाची मोहीम राबविण्यात येत आहे. शिक्षणा विषयी सरकारच्या चुकिच्या धोरानां विरूध्द वाचा फोडण्यासाठी जनजागृती हा प्रमुख उद्देश ठेवून सदरचे अभियान राबविले जात आहे असे या ठिकाणी सांगण्यात आले.
तसेच युवासेना प्रमुख तथा आमदार आदित्या साहेब ठाकरे यांच्या पर्यावरणा विषयी असलेले ध्येय धोरांनाचा प्रचार व प्रसार करणे हा देखील महत्वाचा उद्देश असल्याने सन्माननीय आदित्य साहेब यांच्या वाढदिवसाचे औवचित्त साधून दि. १३ जून पासून धुळे जिल्हात युवासेना सचिव मा. वरूणजी सरदेसाई यांच्या आदेशाने व धुळे जिल्हा विस्तारक शंभू बागुल याच्या मार्गदर्शनाने युवासेना जिल्हा प्रमुख हरीष माळी व जिल्ह्यातील शेकडो युवासैनिकांनी सदर अभियान यशस्वी रीत्या राहवित आहे. दि. ८ रोजी सोनगीर येथील शाळेत सुमारे २५० वह्यांचे वाटप संस्थेचे चेअरमन श्री. एच. आर. माळी व मुख्याध्यापक श्रीकांत महाजन सर यांच्या उपस्थितीत करण्यात आले.
तसेच विद्यार्थ्यांमधे पर्यावरण व वृक्ष यांच्या विषयी प्रेम निर्माण होण्याच्या उद्देशाने तसेच



'झाडे लावा व झाडे जगवा' हा संदेश समाजात देण्यासाठी सुमारे ५० वृक्षांचे रोपण करण्यात आले.'आदित्य मोहत्साव' च्या निमित्ताने सुरू झालेल्या या अभियानात हरीष माळी यांच्या नेतृत्वात आता पर्यंत धुळे जिल्ह्यातील रामी, बोरीस, अंचाळे, नवलवगर येथील जिल्हा परीषद शाळांमध्ये तसेच देवपूर येथील एकविरा हायस्कूल व महाजन हायस्कूल तसेच फागणे येथे आर्थिक व सामाजिक दृष्ट्या वंचित असेलेल्या प्रीस्कूल मधे सुमारे ५००० वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. या कार्यक्रमां प्रसंगी युवासेना जिल्हाप्रमुख हरीष माळी, युवती विस्तारक सोनी सोनार,जिल्हा समन्वयक मोहित वाघ,विधानसभा संघटक तरबेज शेख,शहर संघटक जयेश फुलपगारे, महानगर प्रसिद्ध अधिकारी शुभम फुलपगारे हे उपस्थित होते.



# फुले दांपत्य हे माझे आदर्श आहेत : शैलजा खरात

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या मुळे आपल्या सर्वांच्या जीवनाला आकार मिळालेला आहे.ते नसते तर आपण घडलो नसतो. फुले दांपत्यामुळे महिला प्रत्येक क्षेत्रात पुढे यायला लागल्या आहेत. फुले दांपत्य हे माझे आदर्श आहेत.त्यांच्या मुळेच मी इथपर्यंत येऊन पोहचलेली आहे. असे प्रतिपादन शैलजा खरात यांनी केले. शैलजा खरात यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेश सचिव संघटक पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. शैलजा खरात ह्या सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय असतात.त्यामुळे त्यांनी केलेल्या कार्याची पोहचपावती मिळत असल्याच्या भावना ह्या त्यांना शुभेच्छा देण्यासाठी येणाऱ्या लोकांकडून व्यक्त केल्या जात आहेत.शैलजा खरात यांचा अभिनंदनपर सत्कार हा पुण्यश्लोक काव्यसंग्रह, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा आणि भारतीय संविधानाची उद्देशिका प्रत देऊन करण्यात आला.यावेळी गिरीश बनकर, अजित जाधव, प्रशांत ढावरे,सुनिल रासकर व सुशिल गायकवाड उपस्थित होते.
या सत्कार प्रसंगी शैलजा खरात यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या. अंगणवाडी साठी एक गुंठा जागा देऊन त्यांनी महत्वपूर्ण असे शैक्षणिक कार्य केले. नगरसेविका म्हणून त्यांनी कार्यभार सांभाळला. कोरोना काळात ही त्यांनी लोकांना विशेष सहकार्य केले. तसेच महिला सक्षमीकरण कार्यक्रम ही त्यांनी राबविले. त्यांनी केलेल्या अनेक सामाजिक विषयावरील कार्याबाबत त्यांच्या समवेत विशेष संवाद व चर्चा करण्यात आली.येणाऱ्या काळात प्रदेश स्तरांवर महिलांच्या दृष्टीने चांगले कार्य करायचे असून त्यासाठी विविध उपक्रम हाती घेणार असल्याचे शैलजा खरात यांनी सांगितले.

# पाटणबोरी येथे चोरी; १ लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास

आधुनिक केसरी न्यूज

**पाटणबोरी :** येथे बंद घराची कुलूप तोडून चोरट्यांनी सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख २७ हजार रुपयांचा ऐवज घेऊन फरार झाले,याबाबत फिर्यादी मोहसिन बिस्मील्लाह खान रा.पाटणबोरी यांनी पांढरकवडा पोलीस ठाण्यात दिली आहे,सदर फिर्यादी हा पत्नी व दोन मुलीसह राहत असून जनता ज्युनियर कॉलेज पाटंणबोरी येथे प्राध्यापक म्हणून नौकरी करतो. दि.०५ जुलै शुक्रवार रोजी दुपारी ०३ वाजताच्या सुमारास आपल्या घराचे दरवाजे बंद करून कुटूंबासह नागपूर येथे कामानिमीत्त गेले असता शनिवार दि.०६ जुलै रोजी दुपारी ०४ वाजताच्या दरम्याण घराशेजारी राहणारे विनोद वामन जनगमवार यांनी मोहसिनला फोनद्वारे माहिती दिली की,तुमच्या घराच्या मुख्य दरवाजाचे लाँक तुटलेले आहे. अशी माहिती दिल्याने मोहसिन ने त्यांना माझ्या घरात जावून घरची काय स्थिती आहे हे बघण्यास संगितले असता, घरातील दोन्ही आलमारीचे लाँक तुट्न सामान अस्थाव्यस्त असल्याचे त्यांनी सांगितले तेव्हा मोहसिन ने रात्री ०८ वाजताच्या दरम्याण नागपूर येथून कुटुबासह घरी पोहचले असता घराच्या मुख्य दरवाज्याचे लॉक तुट्न दिसले.व घरातील दोन्ही आलमारीचे लॉक तुटून सामान अस्थाव्यस्त पडलेले दिसले,तेव्हा आलमारीत ठेंवलेल्या सोन्याच्या दागिन्याची व रोक रकमेची पाहणी केली असता,आलमारीत ठेवून असलेली एक सोन्याची पिवक्या धातूची साखली चैन १० ग्रॅम वजनाची किंमत अंदाजे ४५ हजार रूपये,०५ ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या पिवळ्या धात्व्या साखळी चैन किमत अंदाजे ४५ हजार रूपये,कानातील ०२.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे पिवक्या धातूचे डिझाईन असलेले रिंग किंमत अंदाजे ७ हजार रूपये, प्रत्येकी अडीच ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या पिवळ्या धातूच्या (वेडाच्या ) अंगठया किमत अंदाजे १५ हजार रूपये असे एकण ०१ लाख १२ हजार रूपयाचे सोन्याचे पिवब्या धातूचे दागिने तसेच नगदी १५ हजार रूपये असा एकूण ०१ लाख २७ हजार रूपयाचा मुद्देमाल दिसून आला नाही चोरट्यांनी शुक्रवार दि.०५ जुलै रोजी दुपारी ०३ वा.ते शनिवार दि. ०६ जुलै रोजी दुपारी ०४ वाजताच्या पूर्वी कोणीतरी अज्ञात चोरटयाने घराचा कुलूप कोंडा तोडून घराचे आत प्रवेश करून घरातील आलमारीचे लॉक व आलमारीत ठेवन असलेले सोन्याचे दागीने व नगदीं पैसे चोरून नेले असुन प्रकरणी अज्ञात चोरट्यांवर पांढरकवडात पोलीस ठाण्यात अप क्र.७६९/२०२४ भादंवि संहिता कलम ३३१(४), ३०६(अ) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर पुढील तपास नितीन सुशीर,मारोती पाटील आदी पोलीस कर्मचारी करत आहे.

# साई मंदिरात हार फुलांच्या न्यायालयाच्या निर्णयाकडे भक्तांसह ग्रामस्थांचे लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** साईबाबा मंदिरात शिर्डी येथे कोरोणा काळात साईभक्ताना हारप्रसाद, फुलासाठी मंदिरात बंदी केली होती ती अद्यापही सुरु आहे साईभक्ताना दर्शनावर समाधान मानावे लागत होते परंतु साई समाधी व बाबांच्या चरणी फुले किंव्हा हार अर्पण करण्याची अनेक भाविकांची मनोकामना अपुर्ण राहते प्रशासनाच्या निर्णयामुळे मोठ्या प्रमाणावर नाराजी होती. या बाबत शिर्डीत काही तरुणांनी आंदोलन केले होते तर शिर्डीतील जेष्ठ ग्रामस्थ दिगंबर कोते यांनी उपोषण सुद्धा केले होते, परिणामी एक दिवस काही तरुणांनी आंदोलन करत मंदिरात फुले नेण्याचा प्रयत्न केला होता मात्र त्यांच्यावर गुन्हे देखील दाखल झाले होते
हार प्रसादामुळे भाविकांची लूट व आर्थिक शोषण होते व त्यामुळे शिर्डीत गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे असा समज काहीच झाला होता व यावर तोडगा काढण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या बरोबर सर्वपक्षीय ग्रामस्थ्यांची चर्चा झाली मात्र त्यातून मार्ग निघाला नाही व सदर प्रश्न न्यायालयात गेला.परिणामी शिर्डी आणि परिसरातील राहता तालुक्यातील



फुलशेती करणा-या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत होते तसेच यामध्यमातून हातावर फुलांचे गुच्छ व हार प्रसाद विकणाऱ्या व्यावसायीकांचे व त्यावर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अंवलबुन असलेल्या लोकाना मोठा आर्थिक फटका बसत आहे ही बाब जेंव्हा डॉ. सुजय विखे पाटील यांच्या लक्षात आली तेंव्हा त्यांनी स्वतःच्या खर्चाने मा. उच्च न्यायालय औरंगाबाद येथे केस दाखल केली या प्रकरणाची न्यायालयाने दखल घेत भाविकांना मंदिरात हार फुले वाहण्यासाठी संमती दर्शविली होती व

> आमच्या गोरगरीब जनतेच्या हितासाठी व कुंटबातील लोकांसाठी जो नेता प्रयत्न करीत असेल तर त्यांचा सन्मान करण आमचे कर्तव्य आहे म्हणून आम्ही डॉ. सुजय विखे पाटील यांचा सत्कार व पेढेतूला करणार आहोत.
> **सुरेश आरणे, नगरसेवक शिर्डी.**

त्या अनुषंगाने यावर साई संस्थांनला आपले म्हणणे सादर करण्यास दोन आठवड्याची मुदत दिली होती, सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार साई संस्थांनने आपले म्हणणे सादर केले असून त्यांनीही भाविकांच्या श्रद्धेचा विचार करत मंदिरात हार, फुले वाहन्यास संमती दर्शविली आहे. एकंदरतीच १२जुलै रोजी यावर मा. उच्च न्यायालयाचा निर्णय होण्याची शक्यता असून फुलशेती करणारे शेतकरी, हारप्रसाद, फुले विकणारे व्यावसायिक यांच्यासाठी येणारा निर्णय दिलासदायक व आनंदाचा ठरणार आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये डॉ. सुजय विखे पाटील यांचे मोठे योगदान असून १२ जुलैच्या निकालानंतर शिर्डीतील हारप्रसाद, फुले विकणाऱ्या तरुणांसाठी लढा देणारे नगरसेवक सुरेश आरने हे डॉ. सुजय विखे पाटील यांची पेढेतूला करणार असल्याचे समजते अनेकांनी त्यांची मिरवणूक काढण्याची तयारी व नियोजन केले आहे.

# लाडकी बहीण योजनेला डिजिटल फलक व चमकोगिरीमुळे महिलांना मोठा मनस्ताप

## नानासाहेब काटकर यांचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महिलांचे



स्वावलंबन पोषण व सर्वांगीण विकासासाठी २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दरमहा पंधराशे तर वर्षाला १८ हजार रुपये देण्याचा धोरणात्मक निर्णय महायुती सरकारने जाहीर केला आहे यासाठी जशी मुदत वाढवली तशी काही कागदपत्रे देखील कमी केली असताना नगर जिल्ह्यातील अनेक ठिकाणी लावलेले काही डिजिटल बोर्डमुळे महिलांना मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे त्यामुळे शासकीय यंत्रणेनेच नेमकी किती कागदपत्र लागणार आहे त्यासाठी फलक लावून व प्रसिद्धी माध्यामातून जनप्रबोधन करावे अशी मागणी शिर्डी येथील राष्ट्रीय समाज पक्षाचे उत्तर नगर जिल्ह्या अध्यक्ष नानासाहेब काटकर यांनी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांच्याकडे केली आहे.

हजार पाचशे रुपयांचा डिजिटल बोर्ड त्यावर नेता व पदाधिकाऱ्याचा हसरा फोटो व काही हौशी राजकीय चमको कार्यकर्ते यांनी सोशल मीडियावर नेत्याचे फोटो व त्याखाली आपले फोटो व पद टाकून त्यात असलेला मजकूर लागणारी कागदपत्रे योजनेसाठी लाभार्थ्याची पात्रता लाभार्थी याची माहिती असलेले डिजाईन व्हायरल करत असल्याने महिलांचा मोठ्या प्रमाणावर गोंधळ होत असल्याने कौटुंबिक मनस्ताप सहन करावा लागत आहे त्यासाठी शासकीय यंत्रणेने आता ज्या प्रमाणात दुरुस्ती केली आहे त्या आधारे किती कागदपत्रे लागणार आहे याचे प्रबोधन व जनजागृती करावी अशी मागणी आता राष्ट्रीय समाज पक्षाचे नगर जिल्ह्यातील अध्यक्ष नानासाहेब काटकर यांनी केली आहे.




# सीएससी व आपले सरकार सेवा केंद्र चालकांच्या विविध मागण्या पूर्ण करा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** सीएससी व आपले सरकार सेवा केंद्र चालूकांच्या विविध मागण्यांसाठी आज सोमवारी जिंतूर येथील केंद्र चालकांच्या वतीने जिंतूर तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे. सीएससी व आपले सरकार सेवा केंद्र चालूकांना दरमहा विस हजार रूपये मानधन देण्यात यावे. सन 2011 पासून ते आजपर्यंत मिळणारे शेअर मध्ये वाढ केली नसून ती शासनाने वाढ करून देण्यात यावी. लाडकी बहीण योजनेच्या शासन निर्णयामध्ये सीएससी व आपले सरकार सेवा केंद्र चालक यांना देण्यात येणारा मोबदला याबाबत कुठेही उल्लेख नाही व त्याचे योग्य ते प्रशिक्षण देण्यात यावे व त्याची वेब लिंक उपलब्ध करून देण्यात यावी व ती सर्वांसाठी खुली करण्यात यावी.यासह विविध मागण्यांसाठी जिंतूर येथील सीएससी केंद्र चालकांकडून तहसिलदारांमार्फत मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनावर सीएसी व आपले सरकार केंद्र चालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

# विरार-अलिबाग कॉरीडॉर भूसंपादनात मोठा घोटाळा; वडेट्टीवार यांची चौकशीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मोठे पायाभूत प्रकल्प उभे करण्यासाठी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत भूसंपादन केले जाते. यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार सुरू असल्याचे निदर्शनास येत आहे. विरार, अलिबाग येथील भूसंपादन कामात मोठा भ्रष्टाचार झाला आहे. या भ्रष्टाचाराच्या चौकशीची मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केली.
वडेट्टीवार म्हणाले की, पनवेल प्रांत अधिकाऱ्यांकडे विरार-अलिबाग कॉरीडॉरचे भूसंपादन सुरू आहे. वडवली, मोबै, आंबिवली, कुंडेवहाळ, चिंचवली अशा जवळपास 30 ते 35 गावात एजंटगिरी बोकाळली आहे. या ठिकाणी किती हेक्टर जमिनीचा मोबदला दिला हा खरा प्रश्न आहे. किती



शेतकरी लाभार्थी भूसंपादनात आहेत. किती शेतकऱ्यांनी मोबदल्याबाबत हरकती घेतल्या. मा.न्यायालयाकडे किती प्रकरणे प्रलंबित आहेत याची माहिती सरकारने दिली पाहिजे.
महाराष्ट्र महामार्ग भूमी अधिग्रहण कायदा १९५५ च्या सेक्शन 19 C(4) नुसार मोबदला वाटपाबाबत हरकत असल्यास संबंधित दिवाणी न्यायालयाकडे प्रकरण पाठवावे लागते. मात्र असे न करता संबंधित प्रांताधिकाऱ्यांनी स्वतःच शेकडो कोटींचे वाटप केले. या कामासाठी एक खासगी टिम कार्यरत आहे. खोट्या तक्रारी करणे, त्या परत घेणे, सेटलमेंट करणे असा त्यांचा कारभार आहे.
या कामासाठी असलेले एजंट आणि वापरल्या जाणाऱ्या गाड्या यांचा तपशिल आहे. त्याचबरोबर बारापाडा - पनवेल येथे ८.५ एकर जमीन कोणासाठी खरेदी केली हा प्रश्न आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. ही चौकशी विभागीय आयुक्तांमार्फत करण्यात यावी. दोषींना निलंबित करावे. त्याचबरोबर ईओडब्लू कडून देखील चौकशी व्हावी, अशी मागणी श्री. वडेट्टीवार यांनी केली आहे.

# नंदकुमार घाडगे यांचा वारकऱ्यांसाठी त्रिसूत्री कार्यक्रम

## हे मानवतेची सेवा करणारे कार्य : रामदास कांबळे

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा हा आळंदी हून पंढरपुरच्या दिशेने जात असताना पालखी मार्गात गावा गावातून ठीक ठिकाणी वारकऱ्यांच्या सेवेसाठी विविध उपक्रम हाती घेतले जात असतात.वारकऱ्यांच्या दृष्टीने अन्न,पाणी,निवारा आणि आरोग्य या बाबतच्या सेवा अत्यंत महत्वाच्या मानल्या जात असतात.

याच सेवा विशेषकरून वारकऱ्यांना देण्याचा प्रयत्न केला जात असतो.असाच प्रयत्न शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे वाई विधानसभा संघटक नंदकुमार घाडगे यांनी केलेला आहे.त्यांनी कान्हूराज पालखी सोहळ्यासाठी मोफत पाण्याचा टँकर पुरवठा करण्याची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर पेलली.अन्नदान,आरोग्य तपासणी आणि औषधाचे वाटप करणाऱ्या आरोग्यदायी सेवेचे सुद्धा आयोजन नंदकुमार घाडगे यांच्या माध्यमातून करण्यात आले होते.संजीवन हॉस्पिटलचे सर्जन डॉ.डी.बी.बामणे यांच्या विशेष सहकार्यातून हे आरोग्य शिबीर संपन्न करण्यात आले.लोणंद ता.खंडाळा येथे पालखी सोहळा आल्यानंतर शेळके वस्तीवर वाई तालुक्यातील आणि महाबळेश्वर तालुक्यातील दिंडीची सेवा आरोग्यातून करण्यात आली.तसेच वारकऱ्यांसाठी अन्नदान ही करण्यात आले.नंदकुमार घाडगे यांच्या कडून वारीतून वारकऱ्यांसाठी पाण्याचा टँकर,अन्नदान आणि आरोग्य शिबिर आदी त्रिसूत्री कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याने नंदकुमार घाडगे यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांचे विशेष कौतुक करण्यात आहे.आरोग्य तपासणी उपक्रमातून अनेक वारकऱ्यांनी तपासणी करीत विना मोबदला औषधे सुद्धा घेतली.या सेवे प्रसंगी स्वतः शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे वाई संघटक नंदकुमार घाडगे,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सातारा जिल्हा समन्वयक रामदासभाई कांबळे,खंडाळा तालुका प्रमुख सागर कदम,माजी



जिल्हा प्रमुख राजेश कुंभारदरे,हनुमंत ठोंबरे, सुनील पवार,गणेश जाधव आदीं सह इतर उपस्थित होते.या त्रिसूत्री कार्यक्रमाबद्दल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सातारा जिल्हा समन्वयक रामदासभाई कांबळे यांनी नंदकुमार कांबळे यांचे तोंडभरून कौतुक केले.रामदास कांबळे म्हणाले की,वाई विधानसभा संघटक नंदकुमार घाडगे यांच्या कडून नेहमीच सामाजिक उपक्रम हाती घेतले जात असतात.वारकऱ्यांना पाण्याचा टँकर पुरविणे,अन्नदान करणे आणि आरोग्य शिबिरातून वारकऱ्यांची आरोग्य सेवा करणे हा नंदकुमार घाडगे यांनी राबविलेला त्रिसूत्री कार्यक्रम अत्यंत महत्वाचा असून यातून खऱ्या अर्थाने मानवतेची सेवा करणारे कार्य घडलेले आहे.या कार्यातून नंदकुमार घाडगे यांच्या कडून वारकऱ्यांची विशेष काळजी घेतली आहे.असे सुद्धा रामदास कांबळे यांनी सांगितले. तसेच सर्व वारकऱ्यांची वारी चांगली व्हावी.अशी चांगली भावना सर्व वारकऱ्यांच्याप्रति रामदास कांबळे यांनी व्यक्त केली.




# धुळ्यात कॉरिडॉर समितीचे धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** धुळ्यात मंजूर दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडोर कामाची लवकर सुरुवात करण्यात यावी तसेच भूसंपादन लवकर सुरू करून स्थानिक तरुणांना रोजगार द्यावा यासाठी आज धुळे कोरीडोर विकास समितीचे प्रमुख रणजीत राजे भोसले व इतर सदस्यांच्या नेतृत्वाखाली क्युमन क्लब जेलरोड येथे धरणे आंदोलन करण्यात आले.

ह्या ठिकाणी अशी मागणी करण्यात आली कि धुळे शहर व जिल्हयाचा समावेश दिल्ली-मुंबई इंडस्ट्रिअल कॉरिडॉर प्रकल्प (DMIC) अंतर्गत करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पांला 10 वर्षापासून प्रांरभिक मंजूरी मिळाली आहे. या प्रकल्पांना जपान सरकारची मदत होणार असून असंख्य देश या ठिकाणी गुंतवणूक करण्याची शक्यता आहे. या प्रकल्पामुळे धुळे शहराचा चेहरा-मोहरा बदलणार आहे.

शहराचा मोठ्या प्रमाणात विकास होवून रोजगार निर्मिती या ठिकाणी होणार आहे. धुळे शहरालगत दहा गावांच्या हद्दीतील 6 हजार हेक्टर (15 हजार एकर) जमीनीवर हा प्रकल्प साकारला जाणार आहे. या प्रकल्पांमध्ये छोटे-मोठे, मध्यम स्वरुपाचे 300 ते 350 उदयोगधंदे, कारखाने, फॅक्टरी उभ्या राहणार आहेत. या माध्यमातून या ठिकाणी पन्नास हजार ते एक लाख संख्येने रोजगार, जॉब, नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत. या उदयोगांच्या शेजारी नवीन स्मार्ट सिटी उभारली जाणार आहे. या स्मार्ट सिटीमध्ये इंटरनॅशनल स्कूल, गार्डन, दवाखाने, अद्यावत पोलीस स्टेशन, भूमीगत गटारी, भूमीगत वीज, 24 तास पाण्याची व्यवस्था, मनोरंजनाची माध्यमे, रहिवासी तथा व्यापरी संकूले, वायफाय, सीसीटीव्ही, 60 मीटर रुंदीची रस्ते, आदी सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत.या सर्व प्रकल्पांमुळे धुळे शहराच्या व जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार आहे. सदर प्रकल्पाच्या जमीन अधीग्रहणाला राज्य उच्चाधिकार समितीने मंजूरी दिलेली आहे. त्याचप्रमाणे पाणी आरक्षणासाठी शासनाने आदेश काढलेला आहे. सदर प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाने दिनांक 3 फेब्रुवारी 2022 रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम 1961 अन्वये प्रकरण 6 व कलम 2 खंड 2 (ग) लागू करण्यासाठी म्हणजे भूसंपादन करण्यासाठी जिल्ह्यातील प्रादेशिक अधिकारी, धुळे यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यात आला होता. त्यानुसार महाराष्ट्र शासनाकडे दिनांक 21/10 /2022 रोजी प्रादेशिक अधिकारी, धुळे यांनी जमीन अधिग्रहण करण्याचा प्रस्ताव महाव्यवस्थापक, मुंबई यांच्याकडे सादर केलेला आहे.परंतू जमीन अधीग्रहणाचे नोटिफिकेशन निघालेले नाही. सदर प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे प्रलंबित आहे. तरी महाराष्ट्र शासनाने जमीन अधिग्रहणाची त्वरीत नोटिफिकेशन काढून इंडस्ट्रिअल कॉरिडॉर प्रकल्पाला चालना देवून प्रकल्प लवकरात लवकर सुरु करावा, भूसंपादन करून जिल्ह्यातील तरुणांना रोजगार उपलब्ध करून द्यावा. अशी मागणी धुळे कॉरिडॉर प्रकल्प विकास समिती मार्फत करण्यात येत आहे. सदर प्रकल्पांना लवकर मंजूरी देवून नोटिफिकेशन न काढल्यास समिती मार्फत तसेच जिल्ह्यातील युवकांमार्फत जिल्ह्यामध्ये उग्र आंदोलन करण्यात येईल. असा इशाराही यावेळी देण्यात आला.

या धरणे आंदोलनामध्ये रणजीत राजे भोसले, संतोष बापू सूर्यवंशी, राजेंद्र खैरनार, नरेंद्र अहिरे, पी. सी. पाटील, राजू रुस्तम, दादा कोर, रईस काजी, विजय पाटील, प्रभाकर पवार, हुसेन भैय्या साडीवाले, राजू डोमाळे, ,सिद्धांत बागुल, दीपक देसले, चिंतन ठाकूर, हर्षल परदेशी, संदिप पाकले आदि कॉरिडोर समितीचे सदस्य धरणे आंदोलनामध्ये सहभागी झाले होते व या आंदोलनाला विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांनी भेट देऊन पाठिंबा जाहीर केला.

# लाडकी बहीण योजनेच्या कागदपत्रांसाठी तहसील कार्यालयात तुडुंब गर्दी

## नारीशक्ती दूत ॲपला सर्व्हरचा खोडा

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** महाराष्ट्र शासनाने नुकतीच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्यातील 21ते 5 वर्षे वय असणाऱ्या महिलांसाठी सुरू केली आहे. यामधे पात्र लाभार्थी महिलांना दरमहा 1500 रुपये मिळणार आहे. सुरुवातीच्या निकषांमध्ये बरीच शिथिलता आणण्यात आली त्यामुळे महिलांना अर्ज करताना अडचण राहली नव्हती. मात्र, ग्रामीण तसेच शहरी भागातील शेकडो नागरिक हे तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात राशन कार्ड, तसेच उत्पंनाच्या दाखल्यासाठी आपली कामे धंदे सोडून तुडुंब गर्दी करताना पाहायला मिळत आहेत. शासनाने लाभार्थी महिलांची आर्थिक लूट होऊ नये म्हणून नारीशक्ती दूत ॲप सर्व्हरच्या खोड्यामुळे ओपनच होत नसल्याने,आणि ऑफलाईन योजनेचा लाभ घेण्यासाठी अंगणवाडी सेविकांना पुरेशा माहितीचा अभाव असल्याने विहित वेळेत आपला अर्ज बिनचूक भरल्या जातो की नाही या बाबतीत लाभार्थी महिलांची तारांबळ उडाली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरताना महिलांना कमी कागदपत्र आणि वेळेत सोप्यापद्धतीने अर्ज भरता येण्यासाठी नियमात बदल करत उत्पन्नाचा दाखला नसेल तर पिवळे व केशरी रेशनकार्ड स्वीकारले जात आहे. परंतु ऑनलाइन अर्ज भरताना उत्पन्नाचा पर्याय कायम दिसून येत असल्याने लाभार्थी अर्जदार महिला संभ्रमित होताना पाहायला मिळत आहेत. अनेक महिलांची रेशनकार्डमधे नावे नसल्याने ती नावे टाकण्यासाठी तहसील कार्यालयात एकच तुडुंब गर्दी होत आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत 21 ते 65 वयोगटातील महिलांना अर्ज भरण्याची सुविधा ऑनलाइन व ऑफलाइन करून देण्यात आली आहे . शहरी भागासाठी अंगणवाडी सेविका, मुख्यसेविका, वॉर्ड अधिकारी, तसेच सेतू सुविधा केंद्र याठिकाणी अर्ज केला जाऊ शकतो . तसेच ग्रामीण भागासाठी अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, सेतू सुविधा केंद्र, ग्रामपंचायत कार्यालयातील ऑपरेटर, ग्रामसेवक यांच्याकडे अर्ज भरता येतो . तसेच नारीशक्ती दुत ॲप वर ज्या महिला सुशिक्षित आहेत त्या स्वत : आपल्या अँड्रॉइड मोबाईलवर सहज अर्ज भरू शकतात . या योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे देऊन सर्व पात्र महिलांनी फॉर्म भरून योजनेचा लाभ घ्यावा .अर्ज भरून घेण्यासाठी कुणी पैशाची मागणी करत असल्यास अशांची तक्रार करावी, त्यांच्यावर निश्चितच कडक कारवाई केली जाईल .

**प्रतीक्षा तेजनकर तहसीलदार रिसोड**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजेंनेचे अर्ज करण्यासाठी ऑनलाईन नारीशक्ती दूत ॲपवर अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे . मात्र, राज्यभरातून हजारो महिला एकाच वेळी अर्ज भरत असताना ॲप चालत नसल्याने अर्ज भरताना येत नाही . त्यामुळे ऑफलाइन अर्ज भरण्यास प्राधान्य दिले जात आहे .परंतु अर्जबाबत कोणालाच पुरेशी माहिती नसल्याने अडचण निर्माण होत आहे .

**सौ .मीना देवेंद्र नरवाडे मोप**



# मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचे ठेकेदार, इंजिनिअर यांनी वाजविले तीन तेरा

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील मुख्यमंत्री ग्राम सडक योजना मोलखेडा ते कोहाळ्ळा या तीन किंमी रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत आहे. हे काम ना.अब्दुल सत्तार यांनी हा रस्ता मंजूर केला आहे. परंतु उन्हाळ्यात ठेकेदाराने रस्त्यावर खडी व गिट्टी आथरुन दबाई न करता तशाच अर्धवट सोडून दिला आहे.कोणत्याही प्रकारे साईट पट्ट्या भरल्या नाहीत. दबाई केली नाही यामुळे मोलखेडा येथील शेतकऱ्यांना आता पावसाळ्याचे दिवस असल्याने नाहक त्रास सोसावा लागत आहे.मात्र ठेकेदार व इंजिनियर साधे इकडे फिरकून शुद्धा पाहिलेले नाही याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी शेतकरी राजेंद्र वारंगणे व शेतकऱ्यांनी केली आहे.याबाबत सरपंच मनीषाताई ज्ञानेश्वर वारंगणे यांनी वारंवार सागून तक्रारी करून देखील संबंधित विभाग व प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहे. रस्त्यावर खडी अंथरून थातूरमातूर रस्ता करण्याचे काम सुरू केले होते आणि काम बंद केले आहे. अक्षरशः हा रस्ता हातानेही उकरला जात असल्याची स्थिती आहे. यामुळे लगेचच या रस्त्यावर पुन्हा खड्डे तयार झाले आहे.या निकृष्ट दर्जाच्या रस्त्याची चौकशी करा अशी मागणी देखील येथील राजेंद्र वारंगणे व ग्रामस्थ करत आहेत.या रस्ताचे कामाचे कोणत्याही प्रकारचे अंदाज पत्रक लावलेले नाही.कोण ठेकेदार आहे कोण इंजिनियर आहे याबाबत सूचना फलक लावण्यात आले नाही.थातूरमातूर खडी व माती मिस्त्रित मुरुम टाकून ठेकेदार व इंजिनियर भूमिगत झाले आहे. मोलखेडा ते कोहाळ्ळा या अडीच किलोमीटर रस्त्याचे काम उन्हाळ्यात दिवसांत सुरू होते.आता सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने शेतकरी, जनावरे व वाहनधारक यांना मोठी तारेवरची कसरत करावी लागत आहे मात्र प्रशासन साखर झोपेत आहे.होत असलेल्या निकृष्ट दर्जाच्या रस्त्याची तक्रार करायची तरी कोणाकडे, असा सवाल देखील राजेंद्र वारंगणे यांनी केला आहे.



**मोलखेडा गावाचे पक्क्या रस्त्याचे स्वप्न धुळीला :** मोलखेडा ते कोहाळ्ळा या अडीच किलोमीटर मार्गावर असलेल्या गावांना दहा ते पंधरा वर्षात पहिल्यांदाच पक्का रस्ता होत होता . हा रस्ता व्हावा म्हणून अनेक वेळा येथील ग्रामस्थांनी जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरावा केलेला आहे . मोठ्या संघर्षानंतर सुरू झालेल्या या दोन ते अडीच किलोमीटर रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट होत असल्याने येथील नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे . एवढेच नाही तर, ही झालेल्या कामाची जिल्हाधिकारी यांच्यामार्फत चौकशी करावी अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे . निकृष्ट होत असलेल्या रस्त्यामुळे येथील ग्रामस्थांच्या पक्क्या रस्त्याचे स्वप्न धुळीला मिळत आहे **.राजेंद्र वारंगणे सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकरी मोलखेडा, हिवरी, ता . सोयगाव**



# जीवघेणे खड्डे 'जैसे थे'

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊनही प्राधिकरणास जाग येईना ! पत्रकार संघाचे १२ रोजी रास्ता रोको आंदोलन !

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**पहूर : जळगाव छत्रपती संभाजी नगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७ ५ ३ वरील पहूर गावाजवळ झालेली दयनीय स्थिती 'जैसे थे ' असून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन महिना होत आला असला तरी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणास जाग आलेली नाही. सुस्तावलेले राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अजून किती जणांचे बळी घेण्याची वाट पाहत आहे ?असा संतप्त सवाल वाहन चालक, स्थानिक नागरिकांसह विचारीत आहेत. दरम्यान १२जुलै रोजी रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा शहर पत्रकार संघटनेचे अध्यक्ष प्रवीण कुमावत यांनी दिला आहे.**

**जळगांव – छत्रपती संभाजी नगर राष्ट्रीय महामार्गावरील :** जळगाव – छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावर वाघुर नदीच्या पुलाजवळ प्रतिभावंत बालकवयित्री ज्ञानेश्वरी शंकर भामेरे हिच्यासह हात मजूरी करणाऱ्या अरुण मोरे व परराज्यातील एका मजुराचाही याच परिसराने बळी घेतला आहे . पहूर येथील वाघूर नदीवरील पुलानजीक कठडे नसल्याने हा परिसर अत्यंत धोक्याचा बनला आहे . परंतु याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींचे मोठे दुर्लक्ष होत असून नेमके या पुलाचे काम कधी पूर्ण होणार ? हा प्रश्न कायम आहे . जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांना निवेदन देऊन महिना उलटतो आहे . कामसुरू न झाल्यास येत्या १२ तारखेपासून रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल . **प्रवीण कुमावत, अध्यक्ष शहर पत्रकार संघटना पहूर**

उद्यापासून काम सुरू करतो , मला तुमच्या निवेदनाचे काही सांगू नका .
**रमेश , सुपरवायझर, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण जालना .**

## 'लाडकी बहीण'चा फायदा १००टक्के घ्या; पण बहीण आता हुशार झाली

### विठ्ठल बदर पाटील उपजिल्हाप्रमुख

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** निवडणुकीच्या तोंडावर सत्ता जाते या भीतीपोटी शिंदे, पवार व फडणवीस सरकारने महिलांना आमिष दाखवून मतदान मिळवण्यासाठी नवीन युक्ती आखली. बहिणीच्या विरोधात बायकोला उभा करणारा व्यक्ती अजित पवार ज्याला बायको निवडणुकीत पडल्यावर बहिणीची माया जागी झाली. या सरकारला निवडणुकीच्या तोंडावरच का लाडकी बहीण आठवली.असले मत उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख छत्रपती संभाजीनगर चे विठ्ठल बदर पाटील सिल्लोड, सोयगाव भावी आमदार यांनी बोलताना मत व्यक्त केले आहे. शक्यतो भावाला बहिणीचे लग्न झाल्यावर जशी वाटणी करताना ना हरकत किंवा चोळी बांगडीवर मालमत्ता पाहिजे असती त्याच पद्धतीने या नाकर्ते, भ्रष्टाचारी सरकारला १५००/- रुपयाच्या बदल्यात सत्ता पाहिजे आहे. गॅस सिलेंडर चे भाव काय...??? मिळणारी सबसिडी कुठे गायब झाली, अन्नधान्याचे भाव काय...??? त्यावर ५% डढ कर लावला,वीज दराचे भाव वाढवले, पाणी पट्टी, घर पट्टी चे भाव वाढवले, पेट्रोल डिझेल चे भाव किती...??? हे सरकार अजून किती पिळवणूक करणार... भाजीपाल्याचे भाव किती, दुधाचे भाव किती...??? अशी कोणती गोष्ट आहे ज्याच्या किंमती मर्यादेपेक्षा वाढल्या आहेत. लाडकी बहीण आता हुशार झाली आहे. घरादारात जसा मालकी हिस्सा घेतल्याशिवाय राहत नाही तसाच घेत असलेल्या शिल्लक कराचा हिस्सा घेतल्याशिवाय राहणार नाही. ज्यांनी योजना जाहीर केली असे हे महाशय सिंचन घोटाळ्यात 70 हजार कोटी रुपयांचे घेटाळेबाज आहेत. जनतेचा पैसा खायचा आणि वर तोंड करून सांगायचे आम्ही योजना आणली.

माझ्या माय माऊली ह्या अज्ञान नाहीत. निवडणुका लागल्यावर या भ्रष्टाचारी सरकारला निवडणुकीच्या आखाड्यात तोंडावर पाडल्याशिवाय राहणार नाही, ही जाहीर केलेली योजना फक्त घोषणाच राहील असेच शक्यता वाटत आहे. कारण काही दिवसात आचारसंहिता लागणार आहे. त्यानंतर मात्र सरकार कुणाचे सत्तेत येईल सांगता येत नाही.असे मत उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख छत्रपती संभाजी नगर विठ्ठल बदर सिल्लोड सोयगाव भावी आमदार यांनी बोलताना सांगितले आहे.ते पण पक्षाने टिकट दिले तरच उभा राहिल असे त्यांनी सांगितले आहे.



## शिवाजी विद्यालयाची विद्यार्थिनी कल्याणी संतोष गावडे शिष्यवृत्ती परीक्षेत प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जय कालका देवी शिक्षण प्रसारक संस्था संचलित शिवाजी माध्यमिक विद्यालय सावळदबारा येथील पूर्व प्राथमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये वर्ग पाचवी व आठवीचे विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेले आहेत पात्र विद्यार्थ्यांचा व पालकांचा जाहीर सत्कार करण्यात आला यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेच्या व शाळेच्या वतीने प्रोत्साहन पर पारितोषिक देऊन त्यांचा सत्कार संस्था प्रतिनिधी व प्राचार्य कोलते एन आर सर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला यावेळेस वर्गशिक्षक व विशेष शिक्षक यांचे सुद्धा विशेष आभार मानण्यात आले यानंतरही असेच यशाची परंपरा कायम ठेवावी असे शिक्षकांना आश्वासित केले पात्र विद्यार्थ्यांचे नावेउच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता 5 वी. व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता 8 वी. परीक्षेचा निकाल लागला असून यामध्ये इयत्ता पाचवी चे सहा विद्यार्थी पात्र झाले आहेत. कल्याणी संतोष गावडे ही विद्यार्थिनी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली पात्र झाले. सर्व पात्र विद्यार्थ्यांच हार्दिक हार्दिक अभिनंदन यावेळेस सर्व शिक्षक विकास पाटिल विजय सिंग राजपूत भास्कर खमठ भास्कर ससाने भूषण दिसले ज्ञानेश्वर राठोड विनोद जाधव संजय जोशी पोपटराव सोनवणे मुकुंदा व्यवहारे सुदाम राठोड बाबासाहेब कोलते राहुल भडक अजबराव चव्हाण श्याम जाधव विद्यार्थी व पालक उपस्थित होते.



## लोणंद येथे 'संविधान दिंडी'चे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा लोणंद ता.खंडाळा येथे दाखल झाल्यानंतर वारीतून विविध प्रबोधन घडवून आणणाऱ्या संस्था पाहायला मिळाल्या. यांमध्ये संविधानाचा प्रचार आणि प्रसार करणारी संविधान दिंडी दिसून आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे यांच्या वतीने पालखी सोहळ्यात 'संविधान दिंडी' या रथच्या माध्यमातून संविधानाचा जागर करण्यात येत आहे.लोणंद ता.खंडाळा येथे संविधान दिंडीचे आगमन झाल्यावर संविधान दिंडीचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी लोणंदचे मुख्याधिकारी दत्तात्रय गायकवाड, पारगाव खंडाळा आगार विभागाचे व्यवस्थापक जगताप, सातारा सार्वजनिक बांधकाम विभागाचे काटकर मस्तुद नलगे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव विकास खर्गे यांनी बार्टीच्या संविधान दिंडीला उपस्थिती देऊन विशेष शुभेच्छा दिल्या. बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाखाली "संविधान दिंडी" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला विभाग प्रमुख सत्येंद्रनाथ चव्हाण, अधिक्षक डॉ.संध्या नारखेडे यांचे मार्गदर्शन लाभले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सातारा जिल्हा प्रकल्प अधिकारी दिलीप वसावे,राहुल कऱ्हाळे सातारा समतादूत यांनी विशेष परिश्रम घेतले.याप्रसंगी बार्टीचे अधिकारी कर्मचारी आणि वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी वारकऱ्यांना भारतीय संविधान उदेशिकेची प्रत देण्यात आली. उदेशिकेचे वाचन करण्यात आले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# शिवसेना स्टाईलने गणेश गिरींनी तहसीलदारांना धरले धारेवर

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** धर्माबाद तालुक्यात आमदार राजेश पवार हुकूमशाही पदतीने जनतेला, विरोधी पक्षाला, भाजपा पक्षातील खासदार समर्थकांना, कायदाचे धक्का, पदाचा गैर वापर करत हुकूमशाही मालिका धर्माबाद तालुक्यात चालूच आहे. 26जून पासून आमदार हे वादाच्या भवऱ्यात सापडत आहेत.आमदारचे 26 जूनला धर्माबाद नगरपरिषद येथे जनता दरबार व भूमिपूजनाचे कार्यक्रम घेण्यात आले, जनता दरबार हे वादाचे केंद्र बिंदू ठरले आहे, पत्रकार हे सुपारी घेऊन बोलत आहेत असे आमदार राजेश पवार यांची पत्नी सौ.पूनमताई राजेश पवार यांनी जनता दरबार मध्ये पत्रकारान विरोधात चुकीचे विधान केले होते, त्याच चुकीच्या विधाना विरोधात सर्व पत्रकार संघटना, संपादक,पत्रकार यांनी प्रशासनाला निवेदन देत निषेध वेक्त करण्यात आले,आमदार राजेश पवार तेवढ्यावरच न थांबता मनसेचे शहराध्यक्ष सचिन रेड्डी, हणमंत कत्ते, यांच्यावर बॅनर लावले, छापले का म्हणून धर्माबाद पोलीस स्टेशन येथे त्यांच्या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आले,त्या खोटे गुन्हेच्या विरोधात,आमदार राजेश पवार यांच्या विरोधात सखल हिंदू संघटना, लिंगायत समाज व धर्माबाद तालुक्यातील समस्त जनतेच्या वतीने उपविभागीय कार्यालय, तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन, या कार्याल्यावर जण आक्रोश मोर्चा, धर्माबाद बंदची हक्क पुकारण्यात आले होते, वेगवेगळ्या 36 संघटनानी त्या मोर्चाला पाठिंबा देत सहभाग घेतले व्यापारी संघटनेने सुद्धा धर्माबाद कडकडीत बंद ठेवून पाठिंबा दर्शविले नायगाव,उमरी,भोकर,बिलोली,या तालुक्यातील जनतेने सहभाग घेतले धर्माबाद तालुक्यातील जनतमध्ये जोरजोरात चर्चा चालू आहे की आमदार हे धर्माबादच्या जनतेवर एका प्रकारे हुकूमशाही लादत आहे.आज परत एक घटना तहसील कार्यालयात घडली आहे,पुरवठा विभागामध्ये ऑपरेटर सचिन हे काम मागिल दहा वर्षा पासून काम करतो त्याला शासना कडून पगार मिळत नाही, तो मुलगा निस्वार्थपणे जनतेचे सेवा करत आहे त्या मुलाला आमदार राजेश पवार हे तहसीलदार यांच्यावर दबाव टाकून त्याला कामावर काढण्याचे षडयंत्र रचले जात आहे पुरवठा विभागामध्ये जनतेचे काम रखडलेले आहे अशी माहिती मिळताच शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख गणेश गिरी यांनी तहसील



कार्यालय गाटले तहसीलदार वैभव महेंद्रकर यांना धारेवर धरले आज जनता पुरवठा विभागाच्या कामा पासून वंचित आहे त्याला जबाबदार कोण तुमी का? आमदार? आज कार्यालयाच्या बाहेर रांगाच रांगा लागले आहेत,पुरवठाच्या कामासाठी ग्रामीण भागातून वय वृद्ध महिला व पुरुष,अपंग,नागरिक सकाळ पासून कार्यालयाच्या बाहेर उभे आहेत त्यांचे कामे कोण करणार तात्काळ ऑपरेटरची व्यवस्था करा अन्यथा शिवसेना स्टाईलने जन आंदोलन तहसीलदार व आमदार यांच्या विरोधामध्ये करण्यात येईल असे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख गणेश गिरी यांनी तहसीलदार यांना शिवसेना स्टाईलने सांगण्यात आले.

# बाबरा मंडळ अधिकारी व तलाठी यांच्यावर कार्यवाही करणार : तहसीलदारांचे लेखी पत्र

## उपोषणकर्त्या शेतकऱ्याची तब्येत खालावली

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील बावरा येथील महमंद सय्यद नूर सय्यद रा. बाबरा, हे फुलंब्री तहसिल कार्यालयातील तलाठी (सजा बाबरा), मंडळ अधिकारी (बाबरा) व तहसिलदार फुलंब्री यांच्या दुर्लक्षीत पणामुळे अनेक वर्षांपासून न्याय मिळत नसल्यामुळे व त्यांच्या त्रासाला कंटाळुन अमरण उपोषण ४ जुलै पासून सुरू केले होते रविवारी त्यांची तब्येत खालवली त्यांच्यावर घाटी रुग्णालयात उपचार सुरु असून संबधित तलाठी मंडळ अधिकारी यांची तात्काळ चौकशी करून कार्यवाही करण्यात येईल असे पत्र देण्यात आले आहे.

मौजे बाबरा, ता. फुलंब्री, येथील जमीन गट नंबर १५१ मधील त्यांच्या मालकी व ताब्यातील विहीरीचा फेरफार घेण्यासाठी तहसिल कार्यालय फुलंब्री येथे दिनांक ०२/१२/२०२२ रोजी फेरफार घेण्यासाठी भावाने व वडीलांनी माझ्या उप-विभागीय अधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता. अर्ज करण्यापूर्वी मी माझ्या विहीरीचा माझ्या पश्श्यात घेतलेला चुकीचा फेरफार क्रमांक ३४३२ रदद करण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल केले व उपविभागीय अधिकारी साहेबांनी सदर फेरफार रदद करण्याचे आदेश दिले असता त्यानंतर माझ्या भावाने व वडीलांनी अप्पर जिल्हाधिकारी साहेबांकडे अपील दाखल केले, अप्पर जिल्हाधिकारी साहेबांनी उपविभागीय अधिकारी साहेबांचा आदेश रदद करण्याचा आदेश केला असता, मी सदर आदेशाविरुध्द विभागीय आयुक्ताकडे रिव्हीजन दाखल केला. सदर रिव्हीजन अर्जाचा निकाल माझ्या बाजुने लागला व उपविभागीय अधिकारी पैठण फुलंब्री यांचा आदेश कायम करण्यात आला. यानंतर मी वर नमुद केल्याप्रमाणे सदर आदेशान्वये त्यांच्या नावे फेर घेण्यासाठी अर्ज केला होता . त्यांच्या दिनांक ०२/१२/२०२२ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने तहसिलदार साहेबांनी तलाठी सजा बाबरा यांना दिनांक ११/१०/२०२३ रोजी आदेशीत केले तरीही तलाठी सजा बाबरा यांनी फेरफार घेण्यासंबंधी कोणतीही कार्यवाही केली नाही, म्हणुन पुन्हा दिनांक ११/१२/२०२२ रोजी तहसिल कार्यालयातर्फे पत्र काढण्यात आले, तरीही तलाठी व मंडळ अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. दिनांक ०८/०१/२०२४ रोजी तलाठी सजा बाबरा यांना स्मरणपत्र काढण्यात आले, तरीही मंडळ अधिकारी व तलाठी यांनी काहीही कार्यवाही केलेली नाही. त्यांनी वेळोवेळी तहसिलदार साहेबांना भेटुन फेरफार घेण्यासंबंधी व तलाठी व मंडळ अधिकारी यांना समजावुन सांगण्यासंबंधी विनंती केली. परंतु तहसिलदार साहेबांनी माझ्याकडे प्रत्येक वेळी दुर्लक्ष केले मी अनेकवेळा तलाठी, मंडळ अधिकारी व तहसिलदार साहेब यांना फोनवरून विनंती केली, परंतु त्यांनी त्यांच्या अर्जाची व विनंतीची कोणतीही दखल घेतलेली नाही. म्हणून न्याय मिळत नसल्यामुळे ४ जुलै २०२४ गुरुवार पासुन फुलंब्री तहसील कार्यालया समोर अमरण उपोषण सुरु करण्यात आले होते , रविवार ७ जुलै रोजी ४ दिवशी दुपारी त्यांची तब्येयत खालावली . त्यानंतर अखेर सदर तलाठी व मंडळ अधिकारी यांची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे लेखी पत्र नायब तहसिलदार राऊत यांनी दिले यावेळी पोलीस कर्मचारी दराडे सह इतर अधिकारि हजर होते . महमद नुर यांनी पाणी घेतल्या नंतर त्यांनी छातीत त्रास जाणवू लागला म्हणून उपजिल्हा रुग्णालय फुलंब्री येथे उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना घाटीत पाठवले त्यांच्यावर घाटी रुग्णालयात उपचार सुरु करण्यात आले आहे. माझ्या जिवीतास काही बरेवाईट झाल्यास केवळ प्रशासन सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी. असे निवेदन उपोषणकर्ता महमंद सय्यद नुर सय्यद रा बाबरा ता फुलंब्री यांनी तहसिलदार फुलंब्री यांच्यासह मा. उपविभागीय अधिकारी पैठण फुलंब्री मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय छ. संभाजीनगर मा. विभागीय आयुक्त कार्यालय छ. संभाजीनगर यासह मा. पोलीस निरीक्षक, पो स्टे फुलंब्री यांना ह्या पूर्वी दिलेले आहे.





# धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान उमरी तालुका कार्यकारिणी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हमदे गोळेगावकर**

**उमरी :** उमरी शहरांमधे दिनांक 6 जुलै शनिवार रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या संघटनेच्या प्रदेशअध्यक्षा राजश्रीताई राठोड, तसेच नांदेड जिल्हा अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, साई पाटील सावंत (का. सेना जिल्हा अध्यक्ष) संघटनेच्या प्रवक्त्या सुष्मा ताई वाघ, बालाजी दादा यांच्या उपस्थितीमध्ये संघटनेची उमरी तालुका कार्यकारणी निवड करून त्यांना तालुकास्तरीय पदाचे प्रमाण पत्र देण्यात आले. यात उमरी तालुका अध्यक्ष पदी मनोज पाटील गोळेगावकर, तालुका कार्याध्यक्षपदी योगेश पाटील पवळे, शहर अध्यक्षपदी ज्ञानेश्वर कौडगावकर, ग्रामीण तालुका अध्यक्ष पदी प्रकाश पाटील यांची निवड करण्यात आली. यावेळी नवनिर्वाचित पदाधिकार्यांचा सत्कार करण्यात आला.

# शिकारीमागे धावताना बिबट्या पडला विहिरीत

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** शहरालगत कोंढाळी गावाजवळ एका बिबट्याने माकडाला त्याची शिकार करायचे ठरवले. झाडांवर माकडांचा कळप होताच, पण खालीही काही माकड होते. त्या माकडांच्या मागे तो धावला, पण माकड त्यापेक्षाही शहाणे. ते भराभर झाडावर चढले आणि माकडाला आपली शिकार करण्याच्या नादात बिबट एका शेतातील विहीरीत पडला. हे नाट्य एवढ्यावरच थांबले नाही. त्याला विहीरीतून बाहेर काढण्यासाठी वनखात्याची चमू धावली. त्याला विहीरीतून बाहेर काढण्याचे काम अंतिम टप्प्यात आले असतानाच त्याने विहीरीत टाकलेल्या पिंजऱ्याच्या आत जाण्याऐवजी पिंजऱ्यावर उडी घेतली. वनखात्याच्या चमूला काय होत आहे हे कळण्याआधीच या चमूतल्या कर्मचाऱ्यांच्या अंगावर त्याने उडी घेतली आणि आरडाओरडा झाल्यानंतर त्याने जंगलाकडे धूम ठोकली. बिबट्याच्या या महानाट्यातून तो कर्मचारी थोडक्यात बचावला.


शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर